नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

७

कै. भाऊजी दफ्तरी स्मृती
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

या अंकांत

उपनिषदर्थव्याख्या — डॉ. भाऊजी दफ्तरी
श्री नामदेवांची तीर्थावळी — रा. ना. घाटोळे
ब्रम्हफूल (लोककथा) — ना. रा. शेंडे
मध्यप्रांताच्या इतिहासाचीं साधनें — शंकर गोविंद चट्टे
याशिवाय कविता, अभिप्राय, पत्रव्यवहार व संघवार्ता.

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

१०
३
संपादक
दि. ब. पंडित
जून १९५५
किंमत आठ आणे

विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विबुध सारस्वती जन्मभू

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी वर्ष १० जून १९५५ अंक ३ रा

संपादक :
दि. ब. पंडित

संपादक मंडळ : डॉ. ना. के. महाजन, श्री. तु. ना. काटकर, श्री. म. अ. चान्सरकर, श्री. मा. नी. गलगलीकर, श्री. रा. ना. घाटोळे.

उपनिषदर्थव्याख्या

डॉ. के. ल. ऊर्फ भाऊजी दप्तरी

लखांक २

केनोपनिषद्

काल व कर्ता--हें सामवेदाचें उपनिषद् आहे. ह्याचा काल व कर्ता ह्याचा पत्ता लागत नाही, कारण ह्यांत काल्पनिक व्यक्तीचें देखील नांव आलें नाही. पण हें छंदोबद्ध असल्यामुळे भगवद्गीतेच्या पूर्वीचें असावें. भगवद्गीतेच्या पूर्वी कांही उपनिषदें झालीं होतीं हें निश्चित आहे; कारण भगवद्गीतेंतील "ऋषिभिर्बहुधा गीतं छंदोभिर्विविधैः पृथक्" (१३-४) ह्या वचनावरून निश्चितपणें दिसतें की कांही छंदोबद्ध उपनिषदें भगवद्गीतेपूर्वी झालीं होतीं व "ऋषिभिः" ह्या बहुवचनावरून तीं कमींत कमी तीन तरी असावींत. आता छंदोबद्ध उपनिषदें खरोखर ईश, केन, कठ, मुंडक आणि प्रश्न एवढींच आहेत. त्यांपैकी ईश हें जनमेजयाच्या राज्यांत झाल्याचें ईशाच्या प्रकरणांत दाखविलेंच आहे. अर्थात् तें भगवद्गीतेनंतरचें ठरतें; कारण भगवद्गीता भारतीय युद्धानंतर तीन वर्षांच्या आंतच तयार झाली असें मी "उपनिषत्कालनिर्णय" ह्या प्रकरणांत दाखविलें आहे. इतर चार उपनिषदें म्हणजे केन प्रश्न, कठ आणि मुंडक हीं भगवद्गीतेपूर्वीचीं ठरतात.

घटनेची योजना:--पहिल्या श्लोकांत शिष्याचा प्रश्न आहे आणि नंतर सर्व त्याचें उत्तर आहे. उपनिषदाचे चार खंड आहेत. त्यांपैकी प्रथम खंडांत सर्व इंद्रियांच्या व्यापाराच्या बुडाशीं ब्रह्मच आहे असें सांगितलें आहे. दुसऱ्या खंडांत त्या ब्रह्माचें ज्ञान व अनुभव कसा होतो ते सांगून त्यापासून अमृत (आनंद) कसें प्राप्त होतें तें दाखविलें आहे. तिसरा खंड व चवथ्या खंडाचे पहिले पांच श्लोक ह्यांत जगांतील व शरीरांतील सर्व व्यापार ब्रह्माच्या शक्तीनेच चालतात व त्या ब्रह्माचें ज्ञान मनुष्यास (जीवास) बुद्धीनें होतें असें परोक्षवादानें सांगितलें आहे. खंड ४ श्लोक ६-८ ह्यांत ब्रह्माची उपासना कशी करावी तें सांगितलें आहे. खंड ४ श्लोक ९ मध्ये त्या उपासनेचें फळ सांगितलें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह्या उपनिषदाची भाषा बरीच दुर्बोध असल्यामुळे कोठे 'अन्वय'ही दिला आहे.

खंड १, श्लोक १ :

ॐ केनषितं पतति प्रेषितं मनः ।
केन प्राणः प्रथमः प्रैति युक्तः ।।
केनषितांवाचमिमांवदंति चक्षुः ।
श्रोत्रं क उ देवो युनक्ति ॥१॥

अर्थः—कोणी प्रेरणा केल्यामुळे प्रेरित झालेलें मन आपल्या विषयांवर जाऊन पडतें. कोणी प्रेरणा केल्यामुळे [युक्तः] श्रेष्ठ [प्रथमः] प्राण म्हणजे श्वासोच्छ्वास चालतो [प्रैति]. कोणी प्रेरणा केल्यामुळे ही वाणी मनुष्य बोलतात. डोळा आणि कान ह्यांना कोणता देव प्रेरणा करतो ॥१॥

टिप्पणें—"प्रथमः प्राणः"–प्रथम म्हणजे श्रेष्ठ. "प्रथमः प्राणः" म्हणजे सर्व प्राणांमध्ये श्रेष्ठ. प्राण म्हणजे येथेच सांगितलेले, प्राण, चक्षुस्, श्रोत्र, वाणी आणि मनस् हे पांच किंवा बृहदारण्यक ४।४।२ येथे सांगितलेले चक्षुस्, घ्राण, रसनेंद्रिय, वाणी, श्रोत्र, मनस्, स्पर्शेंद्रिय हीं सात आणि स्वतः प्राण अशीं आठ (कारण तेथे ह्या पहिल्या सातांना प्राण असें म्हटलें आहे आणि मुंडक २।१।८ येथेहि त्यांना सात प्राण असें म्हटलें आहे). किंवा प्रश्नोपनिषदांत ३।४-७ येथे वर्णिलेले अपान, प्राण, समान, व्यान आणि उदान. (ह्यांपैकी चक्षुःश्रोत्रमुखनासिका ह्यांत राहणारा प्राण हाच श्रेष्ठ आहे असा प्रश्नोपनिषदाचा भाव आहे). कोणत्याहि प्रकारें प्रथम प्राण म्हणजे श्वासोच्छ्वास करणारा प्राण कारण तो असेपर्यंतच शरीर जिवंत असतें.

ह्या उपनिषदांत वर्णिलेल्या चक्षुस्, श्रोत्र,मन, प्राण आणि वाणी ह्यांना छांदोग्योपनिषद् ३।१३ येथे ब्रह्मपुरुष म्हटलें आहे. अर्थात् यांचेंच येथे वर्णन केलें आहे.

खंड १, श्लोक २:—

श्रोत्रस्यश्रोत्रं मनसोमनो यद्वाचोहवाचं ।
स उ प्राणस्य प्राणः चक्षुषश्चक्षुरतिमुच्य धीराः ।
प्रेत्यास्माल्लोकादमृताभवति ॥२॥

अर्थः—श्रोत्रांतील श्रोत्र म्हणजे श्रवणशक्ति, मनांतील मन म्हणजे मननशक्ति, वाणींतील वाणी म्हणजे वाक्शक्ति, प्राणांतील प्राण म्हणजे श्वसनशक्ति, डोळ्यांतील डोळा म्हणजे दर्शनशक्ति तो आत्माच म्हणजे ब्रह्मच होय (स उ). त्याला शरीरापासून व इंद्रियांपासून सोडवून घेऊन [अतिमुच्य] म्हणजे तो ह्या शरीराहून व इंद्रियाहून भिन्न (वेगळा) आहे असें जाणून घेऊन शहाणे लोक [धीराः] ह्या अज्ञानावस्थेंतून [अस्माल्लोकात्] निघून जाऊन [प्रेत्य] आनंदाचा उपभोग घेणारे [अमृताः] होतात. ॥२॥

टिप्पणें–"अस्मात् लोकात्":–लोक म्हणजे अवस्था असा अर्थ उपनिषदांत पुष्कळ ठिकाणीं आहे. बृहदारण्यकोपनिषदांत ४।३।२० येथे "अहमेवेदं सर्वोस्मीति मन्यते सोऽस्य परमोलोकः" ह्या वाक्यांत 'लोकः' ह्याचा अर्थ 'अवस्था' असाच होऊं शकतो. त्याच उपनिषदांत ४।३।३३ "अथ ये शतं प्रजापतिलोक आनंदाः स एको ब्रह्मलोक आनंदो यश्च श्रोत्रियोऽवृजिनोऽकामहतः अथ एष एव परम आनंदः एष ब्रह्मलोकः सम्राट्' ह्यांतहि 'ब्रह्मलोकः सम्राट्' येथील लोक हा शब्द अवस्थावाचकच आहे. ज्ञानावस्थेला परम लोक किंवा ब्रह्मलोक म्हटलें तर तत्पूर्वीच्या अज्ञानावस्थेस 'हा लोक' 'अयम् लोकः' म्हणणें न्याय्यच आहे; म्हणून 'अस्माल्लोकात्' ह्याचा अर्थ 'ह्या अज्ञानावस्थेंतून' असा आम्ही केला आहे. श्री शंकराचार्यहि असाच अर्थ करतात.

'अमृताः'—'अमृत' म्हणजे 'आनंदवान्' असाहि अर्थ होतो असें 'उपसंहार' प्यारा २८ येथे दाखविलें आहे.

खंड १ श्लोक ३:—

न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति नोमनो ।
न विद्मो न विजानीमो यथैतदनुशिष्यात् ॥
अन्यदेव तद्विदितादथो अविदितादधि ।
इति शुश्रुम पूर्वेषां येनस्तद्विचचक्षिरे ॥३॥

अर्थः—त्या ब्रह्माला डोळा पाहूं शकत नाही. वाणी त्याचें पूर्णपणें वर्णन करूं शकत नाही. आम्ही त्याला पूर्णपणें जाणत नाही [विद्मः] शिष्याला तें कसें समजवून द्यावें हेंहि आम्ही जाणत नाही. ब्रह्म शिष्यास समजवून देणें फार कठीण आहे असा भाव आहे. ॥३॥

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तें जाणलेल्या वस्तूहून भिन्न [अन्यत्] आहे आणि न जाणलेल्या वस्तूहूनहि तें भिन्न [अधि] आहे. (म्हणजे तें पूर्णपणें ज्ञातहि नाही आणि पूर्णपणें अज्ञातहि नाही हा भावार्थ आहे.) ज्यांनी आह्मास तें सांगितलें त्या जुन्या लोकांपासून [पूर्वेषां] हें आम्ही ऐकलें आहे. ॥३॥

टिपणें:—श्लोकाच्या पूर्वार्धाच्या भाषांतरांत "पूर्णपणें" हे शब्द घालण्याचें कारण असें आहे की उत्तरार्धाच्या भावार्थास अनुसरून तसें करणें आवश्यक आहे.

"इति शुश्रुम" इत्यादि शेवटच्या ओळीसारखीच ओळ ईशोपनिषदांतहि दहाव्या आणि तेराव्या श्लोकांत आहे. पण तेथे "पूर्वेषां" ह्या ऐवजीं "धीराणां" असा शब्द आहे. ह्यावरून दिसतें की केनांतीलच श्लोक ईशकर्त्यानें सुधारून घेतला. अर्थात् ईशोपनिषद् केनानंतरचें आहे.

खंड १ श्लोक ४ ते ८:--

यद्वाचानभ्युदितं येन वागभ्युद्यते ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥४॥
यच्चक्षुषा न पश्यति येन चक्षुंषि पश्यति ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥५॥
यन्मनसा न मनुते येनाहुर्मनो मतम् ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदम् यदिदमुपासते ॥६॥
यच्छ्रोत्रेण न शृणोति येन श्रोत्रमिदं श्रुतम् ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥७॥
यत्प्राणेन न प्राणिति येन प्राणः प्राणीयते ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥८॥

अर्थः—जे वाणीकडून पूर्णपणें वर्णिलें जाऊं शकत नाही, पण ज्यामुळेच मनुष्याकडून वाणी उच्चारली जाते तेंच ब्रह्म होय असें तूं जाण. ज्या ह्याची म्हणजेच प्रतीकाची म्हणजेच मूर्तीची लोक उपासना करतात हें ब्रह्म नव्हे. ॥४॥ ज्याचा मनाने पूर्णपणें विचार करतां येत नाही (मनुते) पण ज्यामुळेच मनाच्या विषयांचा [मनः] विचार केला जातो [मतम्] असें म्हणतात, तेंच ब्रह्म होय असें तूं जाण. ज्या ह्याची इत्यादि मागील श्लोकाप्रमाणे. ॥५॥ ज्याला मनुष्य डोळ्याने पाहूं शकत नाही पण ज्यामुळेच डोळ्यांच्या विषयांना [चक्षुंषि] मनुष्य पाहूं शकतो तेंच ब्रह्म होय असें तूं जाण. ज्या ह्याची इत्यादि मागील श्लोकाप्रमाणे. ॥६॥ ज्याला मनुष्य कानाने ऐकूं शकत नाही पण ज्यामुळेच कानाच्या विषयांना [इदं श्रोत्रं] मनुष्य ऐकूं शकतो तेंच ब्रह्म तूं जाण. ज्या ह्याची इत्यादि मागील श्लोकाप्रमाणे. ॥७॥ ज्याचा वर ओढलेल्या श्वासाने [प्राणेन] वास घेतां येत नाही [प्राणिति] पण ज्यामुळेच मनुष्याकडून श्वास [प्राणः] वर ओढला जातो [प्राणीयते] तेंच ब्रह्म तूं जाण; ज्या ह्याची इत्यादि मागील श्लोकाप्रमाणे. ॥८॥

टिप्पणें:--श्लोक ४ व ५ येथें "पूर्णपणें" हे शब्द घालण्याचें कारण असें की श्लोक ३ मध्ये आणि दुसऱ्या खंडांतील श्लोक १।२ मध्ये सांगितल्याप्रमाणें ब्रह्म पूर्णपणें ज्ञातहि नाही आणि पूर्णपणें अज्ञातहि नाही. रामानुजपंथीय रंगरामानुजाचार्यांनीहि "वेदवाण्या साकल्येन नोक्तं" असा "अनभ्युदितं" ह्याचा अर्थ केला आहे आणि "यन्मनसा न मनुते" ह्याचाहि असाच अर्थ केला आहे. आम्हीहि तसेंच केलें आहे.

आठव्या श्लोकाचा आम्ही केलेला अर्थ कित्येकांस चुकीचा वाटेल. पण तसा अर्थ करणें भाग आहे. कारण प्राण म्हणजे गंधज्ञानशक्ति एवढाच अर्थ घेतला तर त्याशीं प्राणाला प्रथमः म्हणजे श्रेष्ठः असें जें विशेषण पूर्वी लागलें आहे तें जुळत नाही. म्हणून प्राण म्हणजे श्वास असा अर्थ आम्ही घेतला आहे. "यत्प्राणेन न प्राणिति" ह्याचा अधिक चांगला अर्थ "जें श्वास वर ओढल्याने जिवंत रहात नाही" असाहि करतां येईल; पण त्यांत एक अडचण आहे व ती हीच की मागील श्लोकांप्रमाणे "यत्" हें द्वितीयांत पद न घेतां तें येथे प्रथमांत घ्यावें लागतें. ही अडचण न मानली तर "जें श्वास वर ओढल्याने जिवंत रहात नाही" हाच अर्थ जास्त सरस आहे. मनः, चक्षूंषि, श्रोत्रं ह्या पांचव्या, सहाव्या व सातव्या श्लोकांतील द्वितीय पादांतील शब्दांचा लक्षणेने मनाचे विषय, डोळ्याचे विषय आणि श्रोत्राचे विषय असे अर्थ करावे लागतात हें उघड आहे. श्री शंकराचार्यांनीहि 'चक्षूंषि' म्हणजे 'चक्षुर्वृत्तीः' असा अर्थ केला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खंड २

खंड २ श्लोक १-२

यदि मन्यसे सुवेदेति ।
दभ्रमेवापि नूनं त्वं वेत्थ ब्रह्मणो रूपम् ।।

यदस्य त्वं यदस्य देवे--
थ्यथनु मीमांस्यमेव मन्ये विदितम् ॥१॥
नाह मन्ये सुवेदेति । नो न वेदेति वेद च ॥
योनस्तद्वेदतद्वेद । नो न वेदेति वेदच ॥२॥

अन्वयः--(हे शिष्य) यदि (ब्रह्म) सुवेद इति मन्यसे, अपि (=तदपि) त्वं ब्रह्मणो रूपं दभ्रमेव नूनम् वेत्थ ॥ अस्य (ब्रह्मणः) त्वं यत्, देवेषु अस्य (ब्रह्मणः) यत्, तत् त्वं नूनं दभ्रमेव वेत्थ ॥ अथनु (ब्रम्ह) मीमांस्यमेव (इति मन्यसे), (तत्) (त्वया) (ब्रम्ह) विदितम् इति मन्ये ॥१॥ "मन्ये (ब्रम्ह) सुवेद" इति (यः) न आह, (ब्रम्ह) न वेद इति (च यः) नो आह स (वेद) च ॥ नः यः तद्वेद तद्वेद (आह), नो (वेद) न वेद इति च (आह) (स) च वेद ॥२॥

अर्थः--हे शिष्या, मी ब्रह्म चांगले (पूर्णपणें) जाणलें असें जरी तूं मानतोस, तरी देखील तूं तें ब्रम्हाचें रूप अल्पच [दभ्रमेव] जाणलेस हें निश्चित आहे. (नूनम्) ॥ त्या ब्रम्हाचा तूं कितवा भाग आहेस [यत्] आणि देवांमध्ये म्हणजे इंद्रियांमध्ये आणि अग्नि, वायु वगैरे शक्तींमध्ये त्या ब्रह्माचा कितवा भाग आहे [यत्] तें तूं अल्पच जाणलेंस हें निश्चित आहे. ॥ हे शिष्या, आता [अथ नु] जर तूं असें मानशील की [मन्यसे] ब्रह्माची मला अजून मीमांसा (म्हणजे विचारच) करावयाची आहे म्हणजे मी ब्रह्म अजून जाणलें नाही, तर मला वाटतें की तूं तें ब्रह्म जाणलेंस ॥१॥ जो "मी ब्रह्म पूर्णपणे जाणतो" असें आणि "मी ब्रह्म जाणत नाही" असें म्हणत नाही, तो ब्रह्म जाणतो ॥ [illegible] जो "मी ब्रह्म जाणतो, "मी ब्रह्म [illegible]" आणि "मी ब्रह्म जाणत नाही" "मी ब्रह्म जाणत नाही" असें [illegible] म्हणतो, तो ब्रह्म जाणतो ॥२॥ ब्रह्म [illegible] [illegible] असा याचार्य आहे आणि [illegible] [illegible] [illegible] सांगितला आहे.

खंड २, श्लोक ३:—

यस्या मतम् तस्य मतम् मतम् यस्य न वेद सः ॥
अविज्ञातम् विजानताम् विज्ञातमविजानताम् ॥३॥

अर्थ--ज्याला वाटतें की मी ब्रह्म जाणलें नाही [अमतम्] त्याने तें जाणलेलें असतें. आणि ज्याला वाटतें की मी ब्रह्म जाणलें त्याने तें जाणलेलें नसतें. ज्याला वाटतें की आपणाला ब्रह्माचें विशेष ज्ञान झालें [विजानताम्] त्याला ब्रह्माचें विशेष ज्ञान झालेलें नसतें आणि ज्यांना वाटतें की आपणाला ब्रह्माचें विशेष ज्ञान झालेलें नाही त्यांना ब्रह्माचें विशेष ज्ञान झालेलें असतें. (कारण ब्रह्माचें पूर्णपणें ज्ञान होऊं शकत नाही एवढें तरी त्याने जाणलें असतें.)

खंड २, श्लोक ४:--

प्रतिबोधविदितं मतममृतत्वं हि विंदते ॥
आत्मना विंदते वीर्यं विद्यया विंद्यतेऽमृतम् ॥४॥

अन्वय--प्रतिबोधविदितं (ब्रह्म) मतं (चेत्) अमृतत्वं हि विंदते ॥ आत्मना वीर्यं विंदते विद्यया अमृतम् विंद्यते ॥

अर्थ—प्रत्येक बोधाच्या वेळीं जाणलें जाणारें म्हणजे अनुभविलें जाणारें ब्रह्म जर [चेत्] विचार केलें गेलें तर, म्हणजे विचार करून तें दुःखरहित आहे असें ठरविलें गेलें तर, त्या तसें ठरविणाऱ्या मनुष्याला अत्यानंदाची [अमृतत्वम्] प्राप्ति होते. (बोध म्हणजे जागृतीमध्ये जें जें अनेक वस्तूंचें किंवा कल्पनांचें ज्ञान होतें तें. अशा प्रत्येक बोधाच्या वेळीं ब्रह्म अनुभवलें जातें हें उघड आहे. बोध जागृतींतच असतो. झोपेंत, मूर्च्छेत, किंवा निर्विकल्प समाधींत बोध नसतो व त्यामुळे त्यावेळीं ब्रह्माचा बोधहि नसतो (कठवल्ली ६ । १२ । १३ व त्यावरील आमचें विवरण पहा.) बोधाशिवाय ब्रह्माचा अनुभव नाही आणि बोध जागृतींतच असतो आणि जागृति शरीराशिवाय असत नाही, म्हणून पुढील वाक्यांत सांगितलें आहे की) शरीराने [आत्मना] वीर्य म्हणजे बोधशक्ति प्राप्त होते आणि बोधाच्या वेळीं विद्येने म्हणजे ब्रह्म दुःखरहित आहे ह्या ज्ञानाने अत्यंत आनंद [अमृत] प्राप्त होतो. (ईशोपनिपद् श्लोक ११ येथेहि हेंच सांगितलें आहे.)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

टिप्पणी—हा श्लोक फारच महत्वाचा आहे. ब्रह्म कसें जाणलें जातें व आनंद कसा प्राप्त होतो हें म्हणजे उपनिषदांचें रहस्य ह्यांत सांगितलें आहे. बोध जागृतींतच असतो. मूर्च्छेत, झोपेंत किंवा निर्विकल्प समाधींतहि एक प्रकारचा बोध असतो असें कोणी म्हणतील; पण तो बोध आहे असा बोध त्या अवस्थांत नसतो, म्हणून तो त्या अवस्थांतील बोध "बोध" ह्या संज्ञेस पात्र नाही. जागृतींतील बोधाच्या वेळींच, त्या बोधाहून बोद्धृ ब्रह्म (आत्मा) भिन्न आहे व तें दुःखरहित आहे असें ज्ञान होऊं शकतें आणि त्यामुळे आनंदाचा अनुभव प्राप्त होऊं शकतो.

"आत्मना"—आत्मा म्हणजे शरीर असाहि अर्थ आहेच. मनुस्मृति १२।१२ येथे "आत्मा" ह्याचा अर्थ "शरीर" असा आहे. उपनिषदांमध्ये "अध्यात्म" हा शब्द वारंवार येतो व तेथे त्याचा अर्थ "शरीरांतील" असा असतो. म्हणजे "अध्यात्म" ह्या शब्दांतील "आत्मा" हा शब्द शरीरवाचक आहे असें ठरतें. येथेहि "आत्मा" हा शब्द शरीरवाचकच घेतला पाहिजे. कारण तसें केल्याशिवाय उपपन्न अर्थ निघत नाही. श्री शंकराचार्य 'आत्मना' ह्याचा अर्थ 'स्वेन स्वरूपेण' असा करतात. ते म्हणतात, "आत्मना स्वेन स्वरूपेण विंदते लभते वीर्यं बलं सामर्थ्यं। धन सहाय-मंत्रौषधियोगकृतं वीर्यं मृत्युं न शक्नोत्यभिभवितुम-नित्यवस्तुकृतत्वात्। आत्मविद्याकृतं तु वीर्यं आत्मनैव विंदते नान्येनेत्यतोऽनन्यसाधनत्वादात्मविद्या-वीर्यस्य तदेव वीर्यं मृत्युं शक्नोत्यभिभवितुम्।" ह्यांत "आत्मविद्येनें मृत्यूस जिंकण्याचें सामर्थ्य मिळतें" असा श्री शंकराचार्यांचा अर्थ दिसतो. पण "अविद्यया मृत्युं तीर्त्वा" असें ईशांत म्हटलें आहे त्याशीं तें विरुद्ध आहे.

खंड २ श्लोक ५:—

इह चेदवेदीदथ सत्यमस्ति।
न चेदिहावेदीन्महती विनष्टिः॥
भूतेषु भूतेषु विचित्य धीराः।
प्रेत्यास्माल्लोकादमृता भवंति॥५॥

अर्थ—इह म्हणजे मरणापूर्वी जर तें ब्रह्म जाणलें तर सत्य वस्तू मिळविली असें होईल, नाहीतर मोठाच नाश होईल. सर्व प्राण्यांमध्ये [भूतेषु भूतेषु] तें ब्रह्म आहेच असा निश्चय केल्याने [विचित्य] शहाणे लोक [धीराः] ह्या अज्ञानावस्थेंतून [अस्माल्लोकात्] निघून जाऊन [प्रेत्य] आनंदाचा उपभोग घेणारे होतात [अमृत भवंति]॥५॥

टिप्पणी—खंड १ श्लोक २ वरील टिप्पणी पहा.

'विचित्य' ह्याचा खरा अर्थ 'गोळा करून' असा आहे. 'सर्वभूतांतून ब्रह्म गोळा करून' म्हणजेच 'सर्वभूतांत ब्रह्म आहे असें ठरवून'.

खंड ३

ब्रह्म ह देवेभ्यो विजिग्ये
तस्य ह ब्रह्मणो विजये देवा अमहीयंत।
त ऐक्षंतास्माकमेवायम् विजयोऽ
स्माकमेवायं महिमेति॥१॥

तद्धैषां विजज्ञौ तेभ्योह प्रादुर्बभूव
तन्नव्यजानंत किमिदं यक्षमिति॥२॥

तेऽग्निमब्रुवन् जातवेद
एतद्विजानीहि किमेतद् यक्षमिति तथेति॥३॥

तदभ्यद्रवत्तमभ्यवदत्कोऽसी—
त्यग्निर्वा अहमस्मीत्यब्रवीत्
जातवेदा वा अहमस्मीति॥४॥

तस्मिंस्त्वयि किं वीर्यम्
इत्यपीदं सर्वं दहेयं यदिदं पृथिव्या मिति॥५॥

तस्मैतृणं निदधावेतद्दहेति
तदुपप्रेयाय सर्वजवेन।
तन्न शशाक दग्धुं सतत एव निववृते
नैतदशकं विज्ञातुं यदेतद्यक्षमिति॥६॥

अथ वायुमब्रुन् वायवेतद्विजानीहि
किमेतद् यक्षमिति तथेति॥७॥

तदभ्यद्रवत्तमभ्यवत्कोसीति
वायुर्वा अहमस्मीत्यब्रवीत्
मातरिश्वा वा अहमस्मीति॥८॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तस्मिंस्त्वयि किं वीर्यम्
इत्यपीदं सर्वमाददीयं यदिदं पृथिव्यामिति ॥९॥
तस्मै तृणं निदधावेतदादत्स्वेति
तदुपप्रेयाय सर्वजवेन
तन्न शशाकादातुं सतत एव निववृते
नैतदशकं विज्ञातुं यदेतद् यक्षमिति ॥१०॥
अथेंद्रमब्रुवन् मघवन्नेतद्विजानीहि ।
किमेतद् यक्षमिति तथेति ।
तदभ्यद्रवत्तस्मात्तिरोदधे ॥११॥
स तस्मिन्नेवाकाशे स्त्रियमाजगाम
बहुशोभनामुमां हैमवतीम् ।
तां होवाच किमेतद् यक्षमिति ॥१२॥

अर्थः--ब्रह्माने देवांना जय मिळवून दिला. त्या ब्रह्माने मिळवून दिलेल्या जयाने देवांना मोठेपणा प्राप्त झाला. (त्यामुळे) देवांना वाटलें की आपणच हा विजय मिळविला आणि आपलाच हा मोठेपणा आहे. ॥१॥ ब्रह्माने देवांना झालेला हा (गर्व) जाणला आणि त्यांच्या पुढे तें ब्रह्म प्रकट झालें. तेव्हा हा कोण यक्ष आहे तें देवांनी ओळखलें नाही. ॥२॥ ते देव अग्नीला म्हणाले, "हे जातवेदा, हा कोण यक्ष आहे तें तूं जाणून घे." अग्नि म्हणाला, "होय मी तें करतो". ॥३॥ अग्नि ब्रह्माकडे गेला. ब्रह्माने त्याला विचारलें, "तूं कोण आहेस?" अग्नि म्हणाला, 'मी अग्नि आहे. मी जातिवेद आहे". ॥४॥ ब्रह्माने विचारलें त्या तुझ्या ठिकाणी कोणतें सामर्थ्य आहे. अग्नि म्हणाला, "पृथिवीवर जें कांही आहे तें सर्व मी जाळूं शकतो." ॥५॥ तेव्हा ब्रह्माने त्याच्यापुढे गवताची काडी टाकली आणि "ही जाळ" असें ब्रह्म म्हणाले, तेव्हा अग्नि आपल्या सर्व शक्तीने त्या गवताच्या काडीवर धावला पण ती तो जाळूं शकला नाही. तेव्हा तो ब्रह्मापासून परत (देवांकडे) गेला आणि म्हणाला, "हा कोण यक्ष आहे तें मी जाणूं शकलों नाही". ॥६॥ नंतर ते देव वायूला म्हणाले, 'हे वायो, हा कोण यक्ष आहे तें तूं जाणून घे.' वायु म्हणाला, 'होय, मी तें करतो' ॥७॥ वायु ब्रह्माकडे गेला. ब्रह्माने त्याला विचारलें 'तूं कोण आहेस?' वायु म्हणाला, 'मी वायु आहे. मी मातरिश्वा आहे.' ॥८॥ ब्रह्माने विचारलें, 'त्या तुझ्या ठिकाणी कोणतें सामर्थ्य आहे?' वायु म्हणाला पृथ्वीवर जें कांही आहे तें सर्व मी उडवूं शकतों (हालवूं शकतों)' [आदातुं] ॥९॥ तेव्हा ब्रह्माने त्याच्या पुढे गवताची काडी टाकली आणि ही उडव असें ब्रह्म म्हणालें, तेव्हा वायु आपल्या सर्व शक्तीने त्या गवताच्या काडीवर धावला. तो ती काडी उडवूं शकला नाही. तेव्हा तो ब्रह्मापासून परत (देवाकडे) गेला आणि म्हणाला, "हा कोण यक्ष आहे तें मी जाणूं शकलों नाही." ॥१०॥ नंतर ते देव इंद्राला म्हणाले, "हे इंद्रा 'हा कोण यक्ष आहे तें तूं जाणून घे' इंद्र म्हणाला, "होय मी तसें करतों" तेव्हा इंद्र त्या ब्रह्माकडे गेला. त्याला पाहून [तस्मात्] किंवा त्याच्या समोर ब्रह्म दिसेनासें झालें. ॥११॥ पण त्याच आकाशांत एक स्त्री त्याला दिसली. तिचें नाम उमा; ती फार सुंदर [बहुशोभना] आहे आणि तिने सोन्याचे दागिने घातले आहेत [हैमवती]. तिला त्याने विचारलें "हा कोण यक्ष आहे?" ॥१२॥

खंड ४

खंड ४—१ ते ३:--

सा ब्रह्मेति होवाच ।
ब्रह्मणो वा एतद्विजये महीयध्वम् इति ॥
ततो हैव विदांचकार ब्रह्मेति ॥१॥
तस्माद्वा एते देवा अतितरामिवान्यान् देवान् ।
यदग्निर्वायुरिंद्रस्तेह्येनन्नेदिष्टं पस्पृशुः
ते ह्येनत्प्रथमो विदांचकार ब्रह्मेति ॥२॥
तस्माद्वा इंद्रोऽतितरामिवान्यान् देवान् ।
स ह्येनन्नेदिष्ठं पस्पर्श
स ह्येनत्प्रथमो विदांचकार ब्रह्मेति ॥३॥

अर्थः--उमा म्हणाली, 'अरे तें ब्रह्म होय. ब्रह्माने विजय मिळवून दिल्यानेच तुम्ही मोठे झालां. वरील हकीकत घडली तीवरून [तस्मात्] दिसून येतें की, अग्नि, वायु आणि इंद्र हे देव इतर देवांहून वरचढ आहेत, [अतितराम्] कारण ब्रह्माच्या अतिनिकट [नेदिष्ठं] जाऊन त्यांनी ब्रह्मास स्पर्श केला आणि ब्रह्म

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रत्यक्ष स्वतः (दुसऱ्याच्या सांगण्यावरून नव्हे) [प्रथमो] जाणून घेतलें. ॥२॥ वरील हकीकत घडली तीवरून [तस्मात्] दिसून येतें कीं इंद्र हा इतर देवांहून वरचढ आहे. कारण ब्रह्माच्या अतिनिकट जाऊन त्याने ब्रह्मास स्पर्श केला आणि ब्रह्म प्रत्यक्ष स्वतःच्या बुद्धीने (दुसऱ्याच्या सांगण्यावरून नव्हे) [प्रथमो] जाणून घेतलें. ॥३॥

टिप्पणी--वरील खंड ३ आणि खंड ४-१-३ ह्यांचा शाब्दिक अर्थ समजणें फारच सोपें आहे. पण हा परोक्षवाद आहे हें उघड आहे. हा परोक्षवाद उलगडला पाहिजे. असा थोडासा प्रयत्न श्री शंकराचार्यांनी केला आहे. ते उमा म्हणजे विद्या असें म्हणतात. इंद्रापुढे ब्रह्म तिरोधान पावलें ह्याचें कारण इंद्राचा इंद्र म्हणजे सामर्थ्यसंपन्न असल्याचा अभिमान अगदीच काढून टाकावा म्हणून ब्रह्माने तसें केलें, असेंहि श्री शंकराचार्य म्हणतात. पण हें बुद्धीस पटत नाही; कारण ह्यावरून जगांत घडणाऱ्या कोणत्या गोष्टीचा निर्देश होतो तें कळत नाही. हा परोक्षवाद दोन विषयांसंबंधाने उलगडावयाचा आहे. एक अधिदैवतविषयासंबंधाने म्हणजे बाह्य जगासंबंधाने व दुसरें अध्यात्मविषयासंबंधाने म्हणजे शरीरासंबंधाने. अधिदैवत विषयांत अग्नि म्हणजे अग्निच आणि वायु म्हणजे वायुच. अधिदैवतविषयांत इंद्र आणि उमा नाहीत. ते अध्यात्मविषयांतच असूं शकतात. अध्यात्मविषयांत अग्नि म्हणजे पचनशक्ति किंवा उष्णताशक्ति, वायु म्हणजे प्राणशक्ति किंवा श्वासोच्छ्वासशक्ति; इंद्र म्हणजे जीव किंवा अहंकार आणि उमा म्हणजे बुद्धि. "तेऽभ्योह प्रादुर्बभूव" (देवांपुढे तें ब्रह्म प्रकट झालें) ह्याचा अर्थ तै० २।६ येथे म्हटल्याप्रमाणे "तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत्" म्हणजे शरीर निर्माण करून त्यांत ब्रह्माने प्रवेश केला. इंद्रापुढे ब्रह्म तिरोधान पावण्याचें कारण जीव व ब्रह्म खरोखर एकच आहेत. जीवाला ब्रह्माचें ज्ञान करून देणारी बुद्धीच ("दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या" कठ० ३।१२) आहे. व ती अहंकाराशिवाय असतच नाही. म्हणून ती जीवासमोर म्हणजे अहंकारासमोर प्रकट झाली असें म्हटलें आहे तें योग्यच आहे. "तस्मिन्नेवाकाशे" म्हणजे त्याच अहंकाराच्या अवस्थेत म्हणजे जागृतींत. हैमवती म्हणजे सोन्याचे दागिने म्हणजे अनेक विद्या धारण करणारी. ह्या परोक्षाने सांगितलेल्या गोष्टींचा उलगडा असा आहे--अग्नि हा शरीराबाहेर सर्व जाळूं शकतो; पण शरीरांतील ब्रह्माजवळ पचनशक्तीच्या किंवा उष्णतेच्या रुपाने असतो तेव्हा त्यास गवताची काडीहि जाळतां येत नाही. तसेंच वायू हा शरीराबाहेर सर्व कांही वाहून नेतो, पण शरीरांतील ब्रह्माजवळ श्वासोच्छ्वास रूपाने असतो तेव्हा त्यास गवताची काडीहि हालवितां येत नाही. इंद्रापुढे म्हणजे जीवापुढे (अहंकारापुढे) तें ब्रह्म अंतर्धान पावलें; कारण तें त्याहून भिन्नच नाही. त्यामुळे इंद्रास त्याचें ज्ञान झालें नाही. तेव्हा त्याच आकाशांत म्हणजेच अहंकाराच्या अवस्थेंत (बुद्धि) [उमा] उत्पन्न झाली व तिने जीवास ब्रह्माचें ज्ञान करून दिलें. इंद्रास ब्रह्माचें ज्ञान झालें तो अग्नि व वायू ह्यांपेक्षा मोठा म्हणून अग्नि आणि वायु हेहि इतर देवांपेक्षा म्हणजे सूर्य, आकाश वगैरेंपेक्षा मोठे, कारण सूर्य, आकाश वगैरे ह्यांनी डोळे, कान वगैरेंत प्रवेश केला तरी ते शरीर जिवंत ठेवूं शकत नाहीत. अग्नि आणि वायु हेच शरीर जिवंत ठेवूं शकतात आणि जिवंत शरीरांतच ब्रह्म जीवरूपाने असतें म्हणून अग्नि आणि वायु ह्यांचा ब्रह्माशी शरीरांत स्पर्श तरी होतो, म्हणून ते इतर देवांपेक्षा मोठे. "प्रथमो विदांचकार" म्हणजे प्रत्यक्ष स्वतःच्या बुद्धीने जाणता झाला, दुसऱ्याच्या सांगण्यावरून नव्हे. एकूण ह्या आख्यायिकेचा अर्थ हाच की जीवच जागृतावस्थेंत बुद्धीच्या साधनाने ब्रह्मास जाणूं शकतो. ऐतरेय ४।३ आ. ६ मध्येहि जीवास इंद्र म्हटलें आहे.

"यक्ष" हा शब्द येथे नपुंसकलिंगी मानला आहे. ह्याचा अर्थ पूज्य महद्भूत असा श्री शंकराचार्यांनी केला आहे. तसा अर्थ करण्यास हरकत नाही कारण ह्यांत यज् म्हणजे पूजणें ही धातु असूं शकते; किंवा "यक्ष" म्हणजे अद्भुतशक्तिसंपन्न भूत असाहि अर्थ घेण्यास हरकत नाही; कारण "यक्ष" नांवाच्या जीवांविषयी अशीच कल्पना प्रसिद्ध आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खंड ४, श्लोक ४-५:--

तस्यैष आदेशो यदेतद्विद्युतो व्यद्युतदा ३
इतीन्न्यमीमिषदा ३ इति इत्यधि दैवतम् ॥४॥
अथाध्यात्मं यदेतद् गच्छतीव च मनोऽनेन
चैतदुपस्मरत्यभीक्ष्णं संकल्पः ॥५॥

अर्थः--'आ' असा आवाज करून ही वीज प्रकाशते [व्यद्युतत्] आणि [इत्] 'आ' असा आवाज करून ती लोप पावते [न्यमीमिषत्] ती त्या ब्रह्माचीच माहिती देते [आदेशः]. हा अधिदैवतविषयाचा विचार झाला. ॥४॥ आता अध्यात्मविषयाचा विचार सांगतो. मन आपल्या विषयाकडे [एतत्] गेल्याप्रमाणें [इव] दिसतें, म्हणजे आपला व्यापार करतें, आणि संकल्प (म्हणजे इच्छाशक्ति) वारंवार [अभीक्ष्णं] आपल्या विषयाचें [एतत] ह्या मनाच्या साधनाने [अनेन] स्मरण करतो; हें जें त्यांचें करणें आहे [यत्] तें देखील त्या ब्रह्माचीच माहिती देते. ॥५॥ ब्रह्माच्या अस्तित्वाशिवाय आणि शक्तीशिवाय ह्या गोष्टी घडूं शकत नाहीत म्हणून ह्या गोष्टी 'ब्रह्म आहे' असें दाखवितात, असा ह्याचा भावार्थ आहे.

टिप्पणी--'इत्यधिदैवतम' ह्याच्या मागे एक 'इति' आम्ही जास्त घालून पाठ सुधरविला आहे; कारण त्याशिवाय अर्थ होत नाही.

'अथाध्यात्मं' ह्याच्यापुढे 'तस्यैष आदेशः' हे शब्द अध्याहृत घेणें भागच आहे, कारण त्याशिवाय अर्थच होत नाही.

'आ ३ इति' म्हणजे 'आ असा आवाज करून' हाच अर्थ विजेच्या वर्णनाशीं चांगला जुळतो.

'आ इत्युपमार्थे' ह्या वाक्यांत 'आ' उपमार्थक आहे असें श्री शंकराचार्य म्हणतात, पण त्याला आधार कांहीच नाही.

'इत्'='इच्छन्दः समुच्चयार्थः' म्हणजे इत शब्दाचा अर्थ 'आणि' असा आहे असें श्री शंकराचार्य म्हणतात तें मान्य करण्यास हरकत दिसत नाही. छांदोग्य ३।१७ येथे 'इत' हा शब्द आहे. तेथे त्याचा 'आणि' हा अर्थ जुळूं शकतो.

"अधिदैवत" आणि "अध्यात्म"—अध्यात्म म्हणजे शरीरांतील आणि "अधिदैवत" शरीराबाहेरील, जगांतील असे अर्थ उपनिषदांमध्ये सर्वत्र दिसून येतात. येथेहि ते अर्थ जुळतात. चवथ्या वाक्यांत शरीराबाहेरील घडामोडींवरून ब्रह्माचें अस्तित्व दाखविलें आहे.

चवथ्या वाक्यांत "विजेच्या प्रकाशाची उपमा ब्रह्माला दिली आहे" असें, बृहदारण्यक २।३।६ येथील वचनाचा आधार देऊन श्री शंकराचार्य म्हणतात, पण तें बरोबर नाही. कारण बृहदारण्यकांतील ती उपमा ब्रह्माला दिली नसून ब्रह्मज्ञ जीवाला म्हणजे बृहदारण्यक २।३।५ येथे वर्णिलेल्या दक्षिणेऽक्षन् पुरुषाला दिली आहे. (उपनिषदांचा उपसंहार प्यारा ३४ पहा.) ह्यामुळेहि 'आ' ह्याचा उपमा असा अर्थ करणें बरोबर नाही. "विद्युतः" हें षष्ठीचें एकवचन आणि प्रथमेचें बहुवचन होऊं शकतें. पण तें प्रथमेचें बहुवचन घेतां येत नाही कारण "व्यद्युतत्" आणि "न्यमीमिषत्" हीं एकवचनी क्रियापदें आहेत. म्हणून "व्यद्युतत्" म्हणजे "विद्योतनम्" आणि "न्यमीमिषत्" म्हणजे "निमेषनम्" असे अर्थ घेऊन "विद्युतः" हें षष्ठीचें एकवचन मानावें. श्री शंकराचार्यांनी असेंच केलें आहे.

खंड ४। ६-९:--

तद्ध 'तद्वनं' नाम तद्वनमित्युपासितव्यम् ।
स एतदेवं वेदाभि यहैनं सर्वाणि भूतानि संवांच्छंति ॥६॥
उपनिषदं भो ब्रूहीत्युक्तात उपनिषद्‌ब्राह्मीं ।
वाव उपनिषदमब्रूमेति ॥७॥
तस्यै तपोदमः कर्मेति प्रतिष्ठा वेदाः
सर्वांगानि सत्यमायतनम् ॥८॥
यो वा एतामेवं वेदापहत्य पाप्मानमनंते
स्वर्गे लोके ज्येये प्रतितिष्ठति ॥९॥

अर्थ--तत् म्हणजे प्राणिजात (सर्वप्राणि) त्यांमध्ये वननीय म्हणजे शोभनीय म्हणजेच शोभलें असतां दिसणारें म्हणजे सर्व प्राण्यांचे ठिकाणीं असणारें म्हणून 'तद्वन' नांवाचें असलेलें तें ब्रह्म. 'तद्वन' म्हणजे सर्व

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्राण्यांच्या ठिकाणीं सापडणारे किंवा पूजनीय असें मानून त्याची उपासना करावी. म्हणजे सर्व प्राण्यांशीं अद्वैतबुद्धीने वागावें. हें जो जाणतो अर्थात् ह्याप्रमाणे जो वागतो त्याची सर्वच भूतें इच्छा करतात. म्हणजे तो सर्व भूतांना आवडतो ॥६॥ "हे गुरो [भो] उपनिषद् सांगा" असें त्वां म्हटलेंस म्हणून [इति] तुला [ते] उपनिषद् सांगितलें [उक्ता] तुला ब्राह्मी म्हणजे ब्रह्माचें ज्ञान करून देणारें उपनिषद आम्ही सांगितलें [अब्रूम] येथे हा गुरुशिष्य संवाद संपला [इति] ॥७॥ त्या उपनिषदाची प्रतिष्ठा अशी आहे की ती (म्हणजे या उपनिषदांतील उपदेशाचा परिणाम असा झाला पाहिजे [illegible] तो उपदेश) ऐकणाऱ्याने तपस् (विषयानंदत्याग), दम (मनाने आत्मानंदाची भावना आणि अद्वैताची भावना) आणि कर्म (सत्कर्म) करावें.

वेद, वेदाचीं सर्व सहा अंगें आणि आणि बुद्धीने ठरविलेलें सत्य हे तीन या उपनिषदाचे आधार [आयतनम्] आहेत. (वेदवेदांगावरून दिसून येणाऱ्या सिद्धांतापेक्षा बुद्धीने ठरविलेलें सत्य जास्त प्रमाण आहे असें येथे सुचविलें आहे व हे वेदवेदांगांतील सिद्धांत आणि बुद्धीने ठरविलेलें सत्य ह्यांमध्ये विरोध नाही असेंहि सुचविलें आहे. ॥८॥ जो हें उपनिषद् ह्याप्रमाणे जाणतो अर्थात् ह्याप्रमाणें वागतो तो आपल्या सर्व पापाला टाकून देऊन सर्व अवस्थांमध्ये श्रेष्ठ [ज्येये] अंत न पावणाऱ्या [अनंते] आनंदाच्या अवस्थेंत [स्वर्गे लोके] प्रतिष्ठित होतो म्हणजे स्थिर राहतो. ॥९॥

टिपणें-स्वर्गे लोके:-"लोक" म्हणजे 'अवस्था' असा अर्थ होतो हें मागे खंड १ श्लोक २ च्या टिपणांत दाखविलेंच आहे. "स्वर्गे लोके" म्हणजे "आनंदाच्या अवस्थेंत" असा अर्थ, म्हणूनच, होतो. श्री शंकराचार्यांनीहि ह्या शब्दांचा अर्थ "सुखात्मके ब्रह्मणि" असा केला आहे. जैमिनीय सूत्रें ६।१-२ ह्यांच्या भाष्यांत श्री शबरस्वामींनीहि स्वर्ग म्हणजे प्रीतिः म्हणजेच आनंद असें ठरविलें आहे. छांदोग्य ८।३ मध्ये "अहरहः स्वर्गं लोकमेति" असें वचन आहे. "अहरहः" ह्या क्रियाविशेषणावरून सिद्ध होतें की "स्वर्ग लोक" ही मरणापूर्वीच प्रत्येक जागृतावस्थेंतच प्राप्त होणारी अवस्था आहे. आणि खरोखर जागृतावस्थेंतच आनंदाचा अनुभव घडतो. "अत्र ब्रह्म समश्नुते" ह्या कठांतील (६।१४) वचनांतहि हाच अर्थ आहे. एकूण "स्वर्ग लोक" म्हणजे आत्यंतिक आनंदाची अवस्था हें निश्चित आहे.

"अनंते"—"अंते" असा पाठ "उपनिषद् ब्रह्मयोगिन" यांच्या भाष्यांत आहे. पण तो अग्राह्य आहे. कारण त्यावरून "मरणानंतरच स्वर्ग प्राप्त होतो" असा अर्थ होईल व तो अर्थ "अहरहः स्वर्गं लोकमेति" किंवा "अत्र ब्रह्म समश्नुते" यांशीं विरुद्ध आहे. "अनंते" म्हणजे जींत कशानेहि खंड पडत नाही असा अर्थ घेऊं नये; कारण "अहरहः स्वर्गं लोकमेति" यावरून स्पष्टच आहे की त्या अवस्थेंत झोपेने खंड पडतो. म्हणून "शक्य तितका कमी खंड जींत पडतो" ती, असा "अनंत" याचा अर्थ घ्यावा. मृत्यूने या अवस्थेंत खंड पडतो किंवा नाही हें जाणणें अशक्य आहे. उपनिषदांमध्येहि यासंबंधाने अनेक मतें आहेत. (उपसंहार १०९-११५ पहा).

"प्रतिष्ठा"—आम्ही "प्रतिष्ठा" याचा अर्थ उपनिषद् जाणण्याचा परिणाम असा केला आहे; श्री शंकराचार्यांनी "उपनिषद् प्राप्त्युपायः" असा अर्थ केला आहे आणि "एतैर्हि संस्कृतस्य सत्वशुद्धिद्वारा तत्वज्ञानोत्पत्तिर्दृष्टा" असें म्हटलें आहे. यावरून "ब्रह्म जाणण्याचा उपाय" असा "प्रतिष्ठा" याचा श्री शंकराचार्यांनी केलेला अर्थ ठरतो. पण तो बरोबर नाही. कारण तो ब्रह्मज्ञानोपाय येथे केनोपनिषदांतच "आयतन" या शब्दाने, वेद, वेदांगें आणि सत्य म्हणजे निर्णय असा सांगितला आहे. आणि तोच बरोबर आहे; कारण कोणत्याहि विषयाच्या ज्ञानाचा उपाय ग्रंथ किंवा बुद्धीचा निर्णय हाच आहे. 'आयतन' याचा अर्थ 'ज्ञानोपाय' हा निश्चित असल्यामुळे 'प्रतिष्ठा' याचा अर्थ त्या उपायांनी प्राप्त झालेल्या ज्ञानाचा परिणाम असाच असला पाहिजे हें अगदी उघड आहे. नवव्या वाक्यांतील 'प्रतितिष्ठति' यांतहि परिणाम असा अर्थ आहे व तोच आठव्या वाक्यांतील 'प्रतिष्ठा' यांत असला पाहिजे. शिवाय ब्रह्मज्ञान ज्याला झालें आहे,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याने काय करावें हें सांगणें आवश्यकच आहे आणि तें इतर कोठे सांगितलेलें दिसत नाही, म्हणून आठव्या वाक्याच्या पूर्वार्धांत सांगितलें आहे असें मानणें भाग आहे. अर्थात 'प्रतिष्ठा' याचा अर्थ 'परिणाम' असाच करावा लागतो.

'तद्वन'–'तत्' म्हणजे 'प्राणिजात' असा अर्थ श्रीशंकराचार्यांनीहि केला आहे. रामानुज पंथीय रंग रामानुजाच्या टीकेंत 'तत्' म्हणजे सर्वत्र पसरलेलें (तन धातूपासून तत् झाला) आणि 'वन' म्हणजे पूजनीय याचा समास करून 'तद्वन' हा शब्द बनविला आहे कोणत्याही रीतीने ब्रह्म सर्वत्र पाहून त्याची पूजा करावी हाच भाव निघतो.

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल	(निवडक मौलिक निबंधांचा संग्रह)	रु. २–४–०
२. सुमन संचय	(कविता संग्रह)	रु. १–४–०
३. मराठी गद्य	(मराठी साहित्यांतील निवडक वेचे)	रु १–८–०
४. अंमलदार	(नाटक) लेखक–श्री पु. ल. देशपांडे	रु. २–०–०
५. भारती	(नाटक) लेखक–श्री नाना जोग	रु. १–८–०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका	लेखिका–श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु. ०–१२–०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन	--डॉ. मा. गो. देशमुख	रु. ०–६–०
२. नाटककार गडकरी	--श्री. द. रा. गोमकाळे	रु. ०–६–०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	--कविभूषण ब. ग. ऊर्फ अण्णासाहेब खापर्डे	रु. ०–८–०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	--प्रा. श्री. मा. कुळकर्णी	रु. ०–८–०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ
केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

क वि ता

मनीषा

येतें मनांत माझ्या
गगनांत झेप घ्यावी
पाहुन पंख खरटे
मनिषा मनीं विरावी ! १

येतें मनांत माझ्या
मधुगीत आळवावें
पिचल्या गळ्यांत कुठलें
संगीत तें खुलावें ? २

येतें मनांत माझ्या
गाण्डीव पेल वीर
भडकेल ताड माझें
नाही सुकाणु दोर ! ३

येतें मनांत माझ्या
उत्तुंग वृक्ष व्हावें
जीवन तयास कुठलें ?
मार्गीत दग्ध व्हावें ! ४

येतें मनांत माझ्या
कांही तरी करावें
अमरत्व घेउनी मी
कीर्तीरुपें उरावें ! ५

पण—

सुटला मनांत माझ्या
सोसाट धुंद वारा
पसरून उष्ण वाळू
झाला पहा सहारा ! ६

होत्या मनांत माझ्या
उत्तुंग त्या मनीषा
परि हाय ! हाय ! काळा
दिसल्या कशा निराशा ७

दिसतो मनांत माझ्या
तम दाट दाट घोर
असलाच किरण एकट
कुठला प्रभाव थोर ? ८

— यशवंत पारधी, भंडारा

जीवन माहेर

आता कशाला संसार
फक्त एकच भिरभिर
एका अज्ञातापल्याड
सर्व जीवनाचे सार

आता कासया ती ओढ
नाही भ्रुकुटी नाही तीर
उरें रिकामा तुणीर
नाही वध्याचें मंथर

आता जीवनाचें गूढ
नेत्रीं होऊनिया नीर
एका सानंद व्यथेचें
तिथे पाझरतो पूर

आता कशाला संसार
सारे सारहि असार
एका अज्ञातापल्याड
माझें जीवन माहेर

—वामन इंगळे, काटोल

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गीत व्यथेचे

जेव्हां झाले प्रकट मनांतिल
अधीर हळवे भाव सुकोमल
तेव्हां कळलें गूढ नभाच्या
वेदीवरल्या रंगच्छटांतिल.

आणिक कळली ओढ अनावर
सागर लाटांची चंद्रास्तव
विरहव्यथेने झुरणाऱ्या त्या
यक्षाच्या नजरेंतिल आर्जव

तुझें जवळपण स्वप्नामधलें
अलगद यावें घुकें सारुनी
जीवनवीणेवर आळविण्या
गीत व्यथेचें एक साजणी!

—तु. शं. कुळकर्णी

श्रमसुगंध

'वाल्मीकि रामायणा'त मातंग ऋषींनी दिग्दर्शिलेले श्रमाचें महत्व.

चंडांशु चौफेर
ओकतो ह्या ज्वाळा
कुऱ्हाड घेऊनी
मातंग निघाला!
ग्रीष्माग्नि पर्जन्य...
चौमासीं इंधन
असावें संग्रहीं
कर्तव्या जाणून!

शिष्यही काननीं
पाठिशीं धावले
श्रमले, कष्टले,
घनांग भरले!

स्वेदांबु निथळे
फुलले कानन
पातले आश्रमीं
काष्ठादि घेऊन!!

मुखेंदु विलसे
कर्तव्यें संतोष
प्रभातीं निघाले
मातंग स्नानास!
निघाले शिष्यही
आणिक, आणिक!
नदीच्या किनारीं
सुगंधी झुळूक!

आकळे न कुणा
येताहे कोठून
अत्यंत मधुर
अनोखे सुमन!
शोधास धाडिलें
गुरूंनी शिष्यास
हिंडतां हिंडता
लगला तपास!

कोण तें आश्चर्य?
गळालें जें काल
घर्म... बिंदू बिंदू
हासती तरुफूल!
तयांचा हा गंध
मोहक, मादक!
श्रमांचा सुगंध
लुटती श्रमिक

—तु. ना. काटकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

श्री नामदेवांची तीर्थावळी

श्री. रा. ना. घाटोळे

लेखांक २ रा

'तीर्थावळी' वरील पहिल्या लेखांकांत तीर्थावळी हें प्रकरण खुद्द नामदेवांनी लिहलें नाही असें प्रतिपादन केलें व त्याकरिता चार कारणें देण्यांत आलीं-- (१) तीर्थावळींतील वर्णन प्रत्यक्षाशीं विसंगत आहे. (२) तीर्थे करण्यास नामदेवांना जो अवधि मिळाला तो एवढा अल्प होता की तेवढया अवधींत संपूर्ण तीर्थे करणें अशक्य होतें. (३) तीर्थावळींतील नामदेवांचे ज्ञानेश्वरविषयक उद्गार हे त्यांच्या अभंगांत आलेल्या ज्ञानेश्वरविषयक उद्गारांशीं विसंवादी आहेत. (४) तीर्थावळींतील नामदेव अहंमन्य व अपक्व वाटतात. ह्या चार कारणांच्या आधारावर 'तीर्थावळी' नामदेवरायांनी लिहिली नसावी असें वाटतें. ह्यावरोवर पहिल्या लेखांकाचा समारोप करतांना नामदेवांची सारी अभंगरचना ही इतर वारकरी संतांप्रमाणेच--पक्वावस्थेंतील म्हणजे गुरुकृपेनंतरची आहे असें विधान केलें. प्रस्तुत लेखांकांत ह्या विधानावर थोडा अधिक विचार करून इतर पुराव्याकडे वळूं.

गुरुकृपेनंतरच अभंगरचनेला प्रारंभ

तीर्थावळींतील नामदेव हे अपक्व व कच्चे दिसतात, ह्या विधानावर कोणी असें म्हणतील की अपक्वावस्थेंत कां होईना, पण तीर्थावळी ही नामदेवांनीच लिहिलेली आहे. कदाचित सद्गुरूच्याच अनुग्रहानें अहंकाराचा फुंज उतरून पूर्णता होण्यापूर्वीच ती लिहिलेली असावी. परंतु हेंहि म्हणणें चूक आहे. कारण नामदेवांची अभंगरचना ही गुरुकृपेनंतरच आरंभ झाली. प्रायः सर्वच संतांनी गुरुकृपा संपादन करून व आपलें प्राप्तव्य पदरांत पाडून घेऊनच काव्यरचनेला प्रारंभ केला. ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी', नाथांचें 'भागवत', समर्थांचा 'दासबोध' इ. सर्व पारमार्थिक ग्रंथ त्या त्या संतांनी प्रथम ईशकृपा वा गुरुकृपा संपादन करून नंतर ते लोककल्याण व लोकशिक्षेकरिता लिहिले. किंबहुना असेंहि म्हणावयास जागा आहे की गुर्वाज्ञा किंवा ईश्वरी आदेश असल्यामुळेच ते लोककार्य करूं लागले; एरव्ही त्यांनी तें सुद्धा केलें असतें किंवा नाही ह्याची शंका त्यांच्या उदासीन व विरक्त वृत्तीवरून वाटूं लागते. तुकारामांनी सुद्धा गुरुकृपेनंतरच अभंगरचना करावयास सुरुवात केली, असा स्पष्ट उल्लेख आहे. " मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश। धरिला विश्वास दृढ नामीं ॥ यावरीया झाली कवित्वाची स्फूर्ति। पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥ " असें महाराज म्हणतात. पुढे प्रत्यक्ष पांडुरंग व नामदेव महाराज हे तुकारामाच्या स्वप्नांत येऊन "नामदेवें केलें स्वप्नामाजीं जागें। सवें पांडुरंगें येवोनिया ॥ सांगितलें काय करावें कवित्व। वाऊगें निमित्त बोलूं नये ॥ अ. प्र. ३७१३ ॥ असें म्हणून काव्यरचनेची एक प्रकारें आज्ञाच केली. अशीच गोष्ट नामदेवांच्या बाबतींतहि घडली.

श्री नामदेवांच्या अभंगांवरून असें दिसून येतें की तुकारामाप्रमाणेंच त्यांनाहि प्रथमपासूनच कवित्व करण्याची आवड नव्हती. विशेष प्रसंगानें ती उत्पन्न झाली. सहज चंद्रभागेच्या काठीं त्यांच्या डोक्यांत अशी कल्पना आली की वाल्मीकींनी शतकोटी रामायण केलें. आपणहि पांडुरंगाच्या कीर्तीला म्हणवितों; मग आपणहि तसें कवित्व कां करूं नयें ? म्हणून त्यांनी नेहमीप्रमाणे देवाजवळ हट्ट घेतला. तेव्हा भक्तवत्सल पांडुरंगानें त्यांना अभंगरचना कशी करावी ह्याविषयी साक्षात्कार दिला (अ. १४०४). त्यांना असेंहि दिसलें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

की "नामा म्हणें हातीं धरोनिया वहया। बैसे लिहावया पांडुरंग ॥ (१४०५). पण तेवढ्याने त्यांचें समाधान होईना. म्हणून त्यांच्या सद्‌गुरूनेहि त्यांना आज्ञा केली. त्यानंतरच ते कवित्व करूं लागले. (नामा म्हणे मज स्वप्न दिलें हरी। प्रीतीने खेचरीं आज्ञा केली. ॥ १४०६). पुढेहि आपले अभंग पुरे करून देण्याविषयी पांडुरंगाशीं भांडत असतां, "म्हणोनिया पोरटा नामा खेचराचा। काया मनें वाचा सत्य करी ॥ (१४०७), अशी त्यांनी प्रार्थना केली. ८४ कोटी ७ लक्षांची संख्या पुरी झाल्यानंतर त्यांनी हा अभंग केला असें समजलें जातें; परंतु त्यांतील प्रतिपादन आणि 'वाचा सत्य करी' ही विनवणी पाहिल्यावर प्रचलित समज बरोबर नाही असें दिसून येईल. तात्पर्य एकच की, नामदेवांनी आपली काव्यरचना गुरुकृपेनंतरच आरंभ केलेली आहे.

कवित्व करावयाचें ठरल्यावर प्रथमतः त्यांचा विषय काय असणार ? अर्थात बालक्रीडा हाच असला पाहिजे. कारण सर्व वारकरी संतांनी आपल्या संप्रदायाला अनुसरून सर्वप्रथम कृष्णाच्या बालक्रीडेवर अभंग रचलेले आहेत. संत नामदेवहि याला अपवाद नाहीत. मंगलाचरणाचे सामान्य श्लोक झाल्यावर बालक्रीडेस प्रारंभ करतांना गणेश-शारदा यांच्या मागून भगवंताचें वंदन झाल्यावर "नामा म्हणे मनीं आठवी खेचर चरण। तयाच्या कृपेने सिद्धि जावो ॥ (बालक्रीडा अभंग ६), असें स्पष्टच म्हटलें आहे. ह्यावरून उघड दिसून येतें की सांप्रदायिक पद्धतीप्रमाणे सर्वप्रथम रचल्या जाणारे बालक्रीडेचे अभंग सुद्धा गुरुमंत्र घेतल्यानंतर म्हणजे पक्वावस्थेंतील आहे; आणि अशा रीतीने बालक्रीडेसुद्धा सारेच अभंग पक्वावस्थेंतील असल्यामुळे नामदेवांच्या कोणत्याच अभंगांत आत्मगौरवपूर्ण उद्‌गार असणें शक्य नाही. परंतु तीर्थावळींत तर उलट प्रकार आढळतो. तीर्थावळीतील नामदेव आपला गौरव स्वतःच करतात, एवढेंच नव्हे तर आपल्या गुरूचेहि गुरु श्रीज्ञानेश्वर आपल्या चरणीं लागले असले अहंमन्य उद्‌गार काढतात. ही अहंमन्यता वा स्वगौरव भक्तिमार्गाशीं आणि तत्कालीन लोकांच्या भावनेशीं पूर्ण विसंगत नाही काय ? म्हणूनच असें म्हणावें लागतें की तीर्थावळीची अभंगरचना ही नामदेवांची नव्हे. ती त्यांच्याविषयी अत्यंत प्रेम असलेल्या कोणी तरी प्रेमकौतुकानें लिहिलेली आहे.

तीर्थावळींत 'परसा भागवत'

तीर्थावळींतील ८ व्या अभंगाच्या शेवटीं 'परसा भागवत आनंदें नाचत। लोटांगणीं येत गरुडापाशीं ॥ ८-१५), असा उल्लेख आलेला आहे. परसा भागवत हा प्रथम नामदेवाचा विरोधक होता ही गोष्ट प्रसिद्ध आहे. पुढे नामदेवांच्या पारमार्थिक अधिकाराची प्रतीति आल्यानंतर तो नामदेवाला शरण आला व नामदेवांनी त्याला आपलें शिष्य बनविलें. अर्थात हें शिष्य बनविण्याचें कार्य नामदेवांनी आपल्या पक्वावस्थेंत म्हणजे स्वतः गुरुकृपा संपादिल्यानंतरचें असलें पाहिजे. परसा भागवताच्या उल्लेखावरून तीर्थावळी ही पक्वावस्थेंतील आहे असें गृहीत धरल्यास एक विचित्र आपत्ति उत्पन्न होते. ती अशी अशी की गुरुकृपा प्राप्त झाल्यावर सुद्धा नामदेवांनी आपले परमगुरु श्री ज्ञानेश्वर ह्यांचे विषयी 'चरणाशी लागला ज्ञानदेव' असे उद्‌गार खरोखरच काढले असावे असें मान्य करावें लागेल. परंतु नामदेवासारखा अत्यंत नम्र, लीन व अहंकारशून्य वारकरी संत 'निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान खेचर। नरहरी सोनार आदि करोनी ॥ समस्त भक्त मिळोनी लोटांगणी येती। आलिंगन देती नामयासी ॥ (२१) असले स्वगौरव करणारे बढाईपूर्ण उद्‌गार काढतील हें केव्हाहि शक्य नाही. तीर्थावळींतील नामदेव हा आत्माभिमानी, अहंमन्य अतएव अपूर्ण व कच्चा दिसतो. तीर्थावळी ही नामदेवांची अपक्वावस्था सूचित करते. परंतु वर सिद्ध केल्याप्रमाणे नामदेवाची सारी काव्यरचना पक्वदशेंतील असल्यामुळे तीर्थावळी ही आपल्या नामदेवाची असणें शक्य नाही. कदाचित ती त्यांच्याच कोणी तरी भक्तानें लिहिली असावी व नामदेवाच्या नांवावर ढकलून दिलेली असावी. यांत सारवत्ता आहे, भक्ति आहे, काव्य आहे, तसाच नामदेवाविषयी अभिमान व प्रेमहि आहे. पण नामदेवांची लीनता व आत्माभिमानन्यूनता नसल्यामुळे ती नामदेवाची नसावी हें उघड आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"नामा म्हणे"

तीर्थावळी हें प्रकरण नामदेवांचे नव्हे असें म्हट-ल्यास सहजच प्रश्न उद्‌भवतो की तीर्थावळींत ठिक-ठिकाणीं 'नामा म्हणे' असे उल्लेख येतात त्याची वाट काय ? त्या शब्दाचा अर्थ विष्णुदास नामा किंवा इतर कोणी तरी नामा असा करणें अशक्यच आहे. कारण पुष्कळ ठिकाणीं 'नामा म्हणे' ह्याचा संबंध काव्य-विषयक व्यक्तीशीं आहे. मग तीर्थावळींतील 'नामा म्हणे' ह्याची वाट काय ? याकरतां तत्कालीन अभंग-रचनेचा थोडा इतिहास पाहिला पाहिजे.

प्रस्तुत लेखाच्या आरंभीं हें सांगितलेंच आहे की कोणत्याहि संताने साहित्यिकाचे भावनेने--काव्य-रचना केलेली नाही. म्हणून त्यांच्या काव्यरचनेंत जसें जसें काव्य निर्माण होत गेलें तसे तसे वर्ग पडतात. उदाहरणार्थ, काव्यरचनेला लागल्याबरोबर बहुतेक संतांनी बालक्रीडेवर लिहिलें आहे. अशाच प्रकारची क्वचित कांही आख्यानपर कविताहि आहे. बाकीची बहुतेक सर्व कविता प्रासंगिक आहे. म्हणजे कीर्तनाच्या ओघांत निर्माण झालेली आहे. अर्वाचीन कवि ज्या-प्रमाणे एखाद्या कोपऱ्यांत बसून "सुखी तरी मी काय कुणाला दुःखी तरी काय ?" अशा प्रकारचें आत्म-निवेदन मुद्दाम लिहावयाचें म्हणून लिहितो तसा प्रकार त्यांच्या ठिकाणीं संभवत नव्हता. अर्थात त्यांच्या वाङ्‌मयांत कोठे कोठे आत्मस्तुतिपर व इतर स्वानु-भवाचे बोल आढळतात, परंतु ते देखील कीर्तनाच्या ओघांतच निघालेले आहेत; असें असूनहि त्यावरून त्यांच्या स्वतःच्या चरित्राचा पत्ता लागेलच असें नाही.. याचें कारण असें की कीर्तनाच्या ओघांत आलेला तो विषय त्यांनी प्रतिपादलेला आहे आणि तो प्रत्येक वेळीं स्वतःला अनुलक्षून असेलच असें नाही. आज अभंग प्रसिद्ध करतांना आपण हा आत्मस्थितिपर, हा उपदेश-पर अशा प्रकारचें वर्गीकरण करतों. परंतु बालक्रीडा व आख्यानपर कविता जर सोडली तर मुळांत त्यांनी आपली कविता अशा रीतीने लिहिलेली देखील सापडणार नाही; तेव्हा रचलेली कुठून आढळणार ? सारांश, अगदी थोडा भाग सोडला तर त्यांची सारी कविताच अशी आहे कीं तिच्यावरून त्यांच्या चरित्राचा बोध होईलच असें नाही. अशा स्थितींत त्यांच्या काव्याचा निर्णय करण्याकरता इतर कांही गमकें उपयोगांत आणावीं लागतात. नामदेववाङ्‌मयाच्या बाबतींत असा थोडासा प्रयत्न झाला आहे. त्यांतील एक गमक असें की शेवटल्या चरणांत त्यांनी केलेला जो आत्मोल्लेख त्यावरून निर्णय घ्यावयाचा. उदाहरणार्थ, नामदेव जरी स्वतःला कांही प्रसंगी 'विष्णुदास' म्हणवीत असले तरी तो 'विष्णुदास' शब्द कांही तरी विशेषणाच्या अर्थाने वापरला आहे. ह्याच्या उलट सोळाव्या शतकांत होऊन गेलेला विष्णुदास हा जरी स्वतःला 'नामा' असें म्हणवीत असला तरी तो आपली कांही ना कांही तरी खूण वेगळ्या रीतीने ठेवतो असें श्री. पांडुरंगशास्त्री ह्यांनी दाखविलें आहे. परंतु नामदेवांच्या बाबतींत ह्या गमकाचा विचार करतांना आणखी एक गोष्ट विचारांत घ्यावी लागते.

ज्ञानेश्वर-नामदेवांच्या पूर्वी कुणी अभंगरचना केल्याचें आज तरी उपलब्ध नाही. पांडुरंगांना दृष्टांत देऊन अभंगाचें लक्षण नामदेवाला समजून सांगावें लागलें ही गोष्ट कमी महत्वाची नाही. ह्या अभंगावरून अभंगरचनेविषयी काय ज्ञान होतें आणि तीं लक्षणें संतांच्या अभंगांना लागतात अथवा नाही हाहि एक प्रश्नच आहे. हा लक्षणपर अभंग असा आहे.—

अभंगाची कळा नाही मी नेणत ।
त्वरा केली प्रीत केशीराजें ॥
अक्षरांची संख्या बोलिले उदंड ।
मेरु सुप्रचंड शर आदि ॥
सहा साडेतीन चरण जाणावे ।
अक्षरें मोजावे चौक चारी ॥
पहिल्या पासोनी तिसऱ्या पर्यंत ।
अठरा गणित मोज आलें ॥
चौक चारी आधीं बोललो मात्रुका ।
बावीसावी संख्या शेवटील ॥
दीड चरणाचें दीर्घ तें अक्षर ।
मुमुक्ष विचार बोध केला ॥
नामा म्हणे मज स्वप्न दिलें हरी ।
प्रीतीने खेचरी आज्ञा केली ॥

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मात्र ह्यावरून असें दिसून येतें की अभंगाच्या शेवटल्या चरणामध्ये कवीनें आपलें नाव नोंदवून ठेवावयाचें हा प्रघात त्यावेळीं पूर्णपणें प्रस्थापित झाला नसावा. ज्ञानेश्वर आपल्या कित्येक अभंगांचे शेवटीं आपल्या उपास्य दैवताच्या नांवाचे (बाप रुखमा देवीवरू) उल्लेख करतात. जसें 'अनंत वेषें अनंत रूपें देखीले त्यासी । बापरुखमादेवी वरू खूण बांधिली कैसी ॥; "बापरुखमादेवीवरू रुपेंवीण देखिला । आटकु ठाकला द्वैताकारे रया ॥' (ज्ञानेश्वर गाथा अभंग ६६४ व ६५) ज्ञानेश्वरांचे शेंकडो अभंग असे आहेत की ज्यांत त्यांनी आपल्या उपास्य दैवताच्या नांवाचा उल्लेख केला आहे. म्हणजे कवीनें आपल्या नांवाचा शेवटीं उल्लेख करण्याचा प्रघात त्यावेळीं पूर्ण रूढ झालेला नव्हता. तसेंच नामदेवांचे कांही अभंग असे आढळतात की ज्यांत कवीच्या नांवाचा उल्लेख मधेंच आला आहे. परंतु तीर्थावळींत कित्येक ठिकाणीं आलेला 'नामा' आणि 'नामा म्हणे' असे उल्लेख प्रत्यक्ष नामदेवांचे नसून, एखादा वृत्तांत सांगणारा ज्याप्रमाणें 'मग टिळक असे बोलले' अथवा 'टिळकांनी असें विचारलें' असें म्हणतो तसल्याच प्रकारचे तृतीयपुरुषी उल्लेख तीर्थावळींत दिसतात. उदाहरणार्थ, तीर्थावळीच्या अगदी पहिल्याच अभंगाचा पहिला चरण जरी वाचला तरी हें स्पष्ट होईल. "नामयाचे भेटीं ज्ञानदेव आले । लोटांगण घातलें नामदेवें" हा उल्लेख कुणी तरी तिसऱ्यानेच केल्याप्रमाणें मनाला एकदम जाणवतो. तसेंच 'पुंडलिकाचे चरण वंदूनिया नामा । उतरले भीमा पैल तीरीं ॥ (५-१५) किंवा 'तीर्थयात्रेप्रति बोलविला नामा । आले निजधामा देवरावो" इत्यादि. अशा रीतीनें तीर्थावळींतील नामदेवांचा उल्लेख हा तृतीय पुरुषीं असल्यामुळे तीर्थावळी ही ग्रंथ नामदेवांनी रचलेली नव्हे असें म्हणावें लागतें.

भाषाकसोटीचा पांगुळगाडा

नामदेव वाङ्मय पारखण्याची दुसरी कसोटी म्हणजे लेखनशैली, भाषा आणि व्याकरण. पैकी लेखनशैलीचा कसोटी म्हणून थोडाबहुत उपयोग होऊं शकतो. उदाहरणार्थ, भक्तशिरोमणि नामदेवांच्या उद्गारांतील जिव्हाळा, साधेपणा आणि सौष्ठव हे एखाद्या कथेकरी नामदेवांच्या भाषेंत येण्याचा संभव फारच कमी आहे. तरीपण ह्याची शक्याशक्यता विशेषतः वाचक आपल्या अनुभवानेच ठरवितो. उरलें व्याकरण आणि भाषा! पण हे दोन्ही पुरावे अगदीच बेभरंवसेशीर आहेत. ह्यासंबंधी महत्वपूर्ण विवेचन श्री. र. ह. भालुंकर ह्यांनी मुळेकृत नामदेव चरित्राला जी व्यासंगपूर्ण दीर्घ प्रस्तावना जोडली आहे त्यांत केलें आहे. आणि भाषेचा पुरावा कसा फुसका व कुचका आहे हें त्यांनी ह. ना. आपटे ह्यांच्या व्याख्यानाचा आधार घेऊन सिद्ध केलें आहे. (परंतु आश्चर्याची गोष्ट ही की ह्याच भाषेच्या पुराव्याचा आधार घेऊन तीर्थावळी ही नामदेवांची आहे असें त्यांनी प्रतिपादन केलें आहे.) मॅक्समुलरच्या भाषाशास्त्राच्या आधारावर उभारलेल्या कल्पना कशा त्याज्य व कुचकामी ठरल्या आहेत हें सुज्ञ वाचकांस माहित असेलच. संतवाङ्मयाच्या बाबतींत तर ही भाषेची कसोटी अत्यंत लंगडी आहे. कारण कीर्तनकाराच्या तोंडीं जाऊन मूळ उद्गारांना जसा विकृतीचा संस्कार होतो त्याप्रमाणें जास्त सुसंस्कृत स्वरूपहि प्राप्त होतें हें तुकाराम महाराजांनी "सालोमालो हरीचे दास । त्यांनी केला अवघा नाश ॥' ह्या अभंगांत व अलीकडे महामहोपाध्याय श्री. पोतदार ह्यांनी सह्याद्रींतील एका लेखांत चांगलें दाखविलें आहे. आपल्या मूळ अभंगांत तुकारामांनी देवाचें मुख 'मलीन' झालें असें म्हटलें होतें. सालोमालोला तें अपभ्रष्ट वाटून त्याने त्याचें 'म्लान' असें शुद्धीकरण केलें पुढे प्रत्यक्ष पांडुरंगांनी दृष्टांत देऊन 'मलीन' हाच प्रयोग बरोबर आहे असें सांगितलें. कारण की त्यावेळीं बाललीला दाखवीत असतां तोंडाला माती लागून तें खरोखरच 'मलिन' झालें होतें. 'म्लान' होण्यासारखी कोणतीच चिंता त्यांच्या मनाला नव्हती.

श्री पोतदारांनी आपल्या लेखांत (सह्याद्रि सप्टेंबर १९५३) ह्या गोष्टीवर चांगलाच प्रकाश टाकला आहे नामदेव वाङ्मयाचे अभ्यासक व प्रकाशक श्री. ह. भ. प. सुबंध ह्यांच्याशीं चर्चा करतांना त्यांनी दोन तीन अभंगांचें स्पष्टीकरण फारच समर्पक केलें आहे. "स्वानंदांत पडोनीया जाती । न संडी वासना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चिघळित हस्ती ॥" (आवटें गाथा १५९) येथें वासनेच्या अनिवारपणाचें वर्णन आहे. आणि त्या दृष्टीने त्यांनी सुचविलेला—"श्वान दांत पडोनीया जाती। न संडी वासना चिघळित हस्ती ॥" हाच पाठ अधिक सयुक्तिक आहे. तीच गोष्ट "नामयानें वंदर घेतले। विठ्ठलासी जित धरिले ॥" आणि "नाम्याने मोह जबाव दिला। तो वैकुंठी सरता केला ॥" (अ. ५९५ व ४३६) ह्यावद्दल त्यांनी सुचविलेले "नामयाने वंद रे घेतले। विठ्ठलासी जित धरिले ॥" आणि "नाम्याने मोहजवा दिला" म्हणजे हिशेब दिला हे त्यांनी सुचविलेले पाठ कोणासहि पटण्यासारखे आहेत. या उदाहरणांचें तात्पर्य एकच की भाषेची शुद्धाशुद्धता हेंहि खास गमक होऊं शकत नाही. सरळ प्रचारांतील शब्दांना ज्याप्रमाणे 'स्वानंदा' सारखें सुसंस्कृत रूप येतें त्याप्रमाणेच मूळ शुद्ध असलेल्या शब्दांना विकृत स्वरूप प्राप्त होऊन त्यांचेहि कांही अर्थ-लावलेले आढळतात. ह्याबाबत परलोकवासी रमाबाई रानडे ह्यांच्या 'आमच्या आयुष्यांतील आठवणी' ह्या पुस्तकांत मोठें गमतीदार उदाहरण आलेलें आहे. "हरीण कासवाचें पोटीं। बाळ परळात जन्मला" ह्या अभंग चरणाचें स्पष्टीकरण त्यांच्या इथला एक मनुष्य मोठ्या भाविकपणें करीत असे. अर्थात मूळ चरण असा आहे की—"हिरण्यकश्यपाचें पोटीं। बाळ प्रल्हाद जन्मला ॥ इत्यादि. उदाहरणाचे तात्पर्य उघड आहे. सारांश, भाषेची शुद्धाशुद्धता अथवा व्याकरणाचा प्रयोग हेंहि आहे ह्या स्थितींत निर्णायक होऊं शकत नाही. म्हणून डॉ. तुळपुळे, श्री. पांगारकर, प्राचार्य दांडेकर इत्यादि श्रेष्ठ लेखकांनी म्हटलें आहे की आजच्या उपलब्ध दोन तीन हजार अभंगांत अवघे पांच सहाशें अभंग नामदेवांचे निघूं शकतील. मग नामदेवांचे अभंग निवडून काढण्यास कांही मार्गच नाही काय? भाषेचा पांगुळगाडा सोडून दिल्यास दुसरा आधार तरी कोणता, असा प्रश्न सहजच उद्भवतो. आमच्या मतें आणखीहि एक दोन गमकें उपयोगांत येऊं शकतात. तीं कोणतीं हें पाहूं.

आत्मगौरवाचा अभाव

मागे हें सांगितलेंच आहे की नामदेवांचा स्वभाव अत्यंत लीन निरहंकारी व प्रेमळ होता. सर्व वारकरी संतांप्रमाणें त्यांच्यांतहि अहंकार व आत्मगौरव ह्यांचा अभाव होता. म्हणून जेथे कुठे स्वतःची महति व त्या दृष्टीने रंगविलेलें स्वतःचें चरित्र असेल तेथे ते नामदेवांचे उद्गार नसावे हें समजणें जास्त सयुक्तिक होईल. आत्मपर कविता संत करीत नव्हते असें नाही. परंतु त्यांतील उद्गार स्वतःच्या बढाईचे नसून जेवणानंतर येणाऱ्या ढेकराप्रमाणे आत्मतृप्तीचे असतात; व तेहि क्वचित प्रसंगोपात्त काढलेले असतात. 'घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं। मुक्त आत्मस्थिति सांडवीन ॥' ह्या प्रसिद्ध अभंगांत तुकारामांनी 'धन्य म्हणवीन इहलोकीं लोका। धन्य आम्ही तुका देखियला ॥' असे आवेशाने उद्गार काढले आहेत. पण हे उद्गार त्यांच्या निर्याणसमयीचे आहेत हें लक्षात ठेवलें पाहिजे. नामदेवांनीहि "परेहुनी परतें घर। तेथे राहूं निरंतर ॥ सर्व सत्ता आली हाता। नामयाचा खेचर दाता ॥" किंवा 'मीच माझा भक्त' (१७९५) असे जे उद्गार काढले आहेत तेही असेच प्राप्तव्य पदरांत पाडून घेतल्यानंतरच्या अंतिम स्थितींतील आहेत. एरव्ही 'रंकाहूनि रंक संताचा सेवक। मी नामधारक विठोबाचा ॥' (१४५६) आरुण सावडे नेणे कांही वेडे' (१६०८) 'नामा म्हणे देवा स्वामीया तूं एक। आवडता सेवक करी मज' असे विठोबाच्या पाईकाला शोभण्यासारखे अति लीन व नम्रपणाचे बोलच त्यांच्या मुखांतून बाहेर पडत असत. वस्तुतः हाच मुद्दा प्रस्तुत लेखाच्या प्रारंभीं येऊन गेला आहे. व त्यावेळीं हेंहि सांगितलें आहे की तीर्थावळींतील अभंग हे नामदेवाच्या लीन व आत्मगौरवशून्य स्वभावाशीं विसंगत असल्यामुळे तीर्थावळी ही नामदेवांची असूंच शकत नाही.

हास्यास्पद विसंगति

ह्याशिवाय तीर्थावळीच्या अभंगांत हास्यास्पद विसंगतीहि भरपूर आहे. उदाहरणार्थ, ब्राह्मणांच्या कर्मठपणावर, दांभिकपणावर व पोकळ अभिमानावर टीका तर आहेच. (२५, २०, २१) पण त्याबरोबरच मावंद्याकरिता ब्राह्मणांनाच पाचारण केलें व त्यांची प्रार्थनाहि केली व तीहि प्रत्यक्ष परमेश्वरानेच केली 'एक शीत अन्न दिजे द्विजामुखीं। राहे सदा सुखी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कल्पवरी' ॥ (२२१६) असेहि उद्गार पांडुरंगांनीच काढले आहेत. म्हणजे पर्यायानें ब्राह्मणांच्या ब्राह्मणत्वासमोर मान तुकविली आहे. तसेंच देवांनी नामदेवाचें उच्छिष्ट स्वीकारलें (जातीचे ते शिंपी विश्व जाणें यातें। प्रत्यक्ष सांगाते जेवियले), परंतु त्याबरोबरच लगेच (घाबरून जाऊन की काय?) प्रायश्चित्तहि घेतलें आहे. हें सर्व वर्णन विसंगत तर आहेच, पण त्यांत निरर्थकताहि भरपूर आहे. 'प्रत्यक्ष तीर्थावळी' हें ह्या प्रकरणाचें जें नामाभिमान आहे तेथपासूनच विसंगतीला सुरवात होते. ह्या प्रकरणांत तीर्थयात्रेचें वर्णन करणारे अभंग फारच थोडे आहेत. नामदेवासारख्या थोर व श्रेष्ठ प्रतीच्या संतांनी असलें हास्यास्पद व विसंगतीपूर्ण प्रकरण लिहिलें असावें ह्यावर विश्वास ठेवणें कठीण आहे.

श्री. भाळुंकरांचा भाषा पुरावा

सरतेशेवटीं श्री. र. ह. भाळुंकर यांनी मुळेकृत नामदेवचरित्राला जी एक विस्तृत प्रस्तावना जोडली आहे त्यांतील एका विधानाचा परामर्श घेऊन हा लेख संपवूं. श्री. भाळुंकर यांनी तीर्थावळींतील ५०-६० शब्दांची लांब यादी देऊन त्यांतील जुने शब्द, जुनीं रूपें व उकारबाहुल्य यावरून ही तीर्थावळी आद्य नामदेवांचीच आहे असें गृहीत धरलें आहे. आम्ही मागें श्री. भाळुंकरांच्या प्रस्तावनेचा उल्लेख केला आहेच. या प्रस्तावनेंत त्यांनी भाषापुरावा कसा भ्रामक व लंगडा आहे हें स्वतःच ह. ना. आपटे यांच्या लेखाद्वारें सिद्ध केलें आहे. परंतु त्याच भाषाकसोटीच्या लंगड्या व फुसक्या आधारावर ते तीर्थावळी नामदेवांची असें मान्य करतात. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे तीर्थावळींतील जुने शब्दप्रयोग व भाषा गृहीत धरून एवढेंच म्हणतां येईल की ती कदाचित नामदेव समकालीन त्यांच्याच एखाद्या भक्तानें लिहिली असावी. परंतु ती नामदेवांनी लिहिली असें सिद्ध होऊं शकत नाही.

तीर्थावळीचे विविध अवतार

नामदेवांच्या नांवावर मोडल्या जाणाऱ्या गाथेंतील ह्या सुप्रसिद्ध 'तीर्थावळी' प्रकरणाशिवाय आणखीहि एक 'तीर्थावळी' उपलब्ध झालेली आहे, असा उल्लेख पहिल्या लेखांकांत केलाच आहे. हें प्रकरण श्री. सुबंध ह्यांनी आपल्या सार्थगाथेच्या परिशिष्टांत प्रसिद्ध केलें आहे. तसेंच हल्ली तें पुण्याच्या 'प्रेमबोध' मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध केल्या जात आहे. प्रस्तुत लेखक संशोधनाच्या निमित्तानें दौऱ्यावर असतां पुणें येथील भांडारकर इन्स्टीट्यूटमध्यें तीर्थावळींचीं दोन चोपडीं पाहिलीं. दोहोंतील मजकूर एकच आहे. तथापि मौज ही की एकांत १५०३ हा शक दिला असून दुसऱ्यांत १७०१ हा शक दिला आहे. ('वासुदेवस्य लिखितं शके १७०१ वर्षे जाणिजे'—असा उल्लेख शेवटीं आहे). ह्याशिवाय ह्याच तीर्थावळीची एक हस्तलिखित प्रत श्री. सोनोपंत दांडेकर ह्यांच्याकडे पहावयास मिळाली. त्यावर विष्णुदास नामाचा उल्लेख आहे. परंतु भांडारकर इन्स्टीट्यूटमधील शके १५०३ च्या प्रतींत केवळ 'नामा म्हणे' असा उल्लेख आहे. तीर्थावळीचे हे दोन तीन अवतार, त्यांतील शकांचा व कर्त्यांच्या नांवांचा गोंधळ पाहिल्यानंतर कोणती तीर्थावळी खरी मानावी हा प्रश्नच आहे. तथापि त्यावरून एक गोष्ट निश्चित सिद्ध होते व ती मोठीच महत्वाची आहे. ती ही की सोळाव्या शतकांत कुणी तरी 'नामदेव' (तीर्थयात्रा करणारा) होऊन गेला. व कदाचित ह्याच नामदेवानें पंजाबांत वस्ती करून हिंदी भाषेंत पद्यरचना केली असावी असाहि संशय वाटूं लागतो. मात्र नामदेवांच्या गाथेंत जें 'तीर्थावळी' नामक प्रकरण आहे तें निश्चितपणें ह्या नूतन अवतारापेक्षा जुनें असून काव्यदृष्ट्या सरस व गोड उतरलें आहे. जुनें म्हणण्याचें कारण असे की महिपतीनें आपल्या ग्रंथांत ह्या प्रकरणांतील कित्येक अभंग—त्यांतील शब्द व कल्पनासहित जसेच्या तसे उतरून घेतलेले दिसतात.

समारोप व निष्कर्ष

आतापर्यंत लांबलेल्या ह्या दोन लेखांचा समारोप करतांना एवढेंच म्हणतां येईल की नामदेवांच्या गाथेंतील हें प्रकरण खास नामदेवांच्या हातानें लिहिलें गेलेले दिसत नाही. तें कुणी तरी नामदेवभक्तानें त्यांच्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एक सुंदर लोककथा

ब्रम्हफूल

ना. रा. शेंडे, नागपूर

रात्र झाली तरी म्हातारीचीं नातवंडं झोंपीं जाईनात. तीं म्हातारीला विलगून म्हणालीं, "आजी माय, एखादी कहाणी सांग ना." तिनं बरेच आढेवेढे घेतले पण नातवंडं कांही केल्या आपला हट्ट सोडीनात. तेव्हा म्हातारी कहाणी सांगूं लागली....

चमन नांवाची नगरी होती. तेथील राजा मोठा ग्यानी ध्यानी होता. राज्यांत सगळीकडे सुखशांती होती. कोणाला दुःख नाही, कोणाला त्रास नाही, कोणाला चिंता नाही. लोक भल्या पहाटे उठत, आंघोळ करीत, पूजाअर्चा करीत आणि राजाचा जयजयकार करीत.

नामदेवांची तीर्थावळी

(पान १८ वरून)

विषयीच्या अभिमानाने लिहिलें असावें. त्यांतील ६१ अभंगांपैकी फक्त शेवटले तीन अभंग मात्र नामदेवांचे असावे. हे तीन अभंग तत्पूर्वीच्या ५८ अभंगांशीं पूर्णपणें विसंगत वाटतात, असें आम्ही पहिल्या लेखांत सांगितलें आहेच. हे तीन अभंग सोडून इतर अभंगांतून आलेला तीर्थांचा क्रम, तीर्थस्थानांची संख्या, नामदेवांचा फाजील गौरव, ज्ञानेश्वरासंबंधी अनुदारपणाचे उद्‌गार, त्यांतील नामदेवांची अपक्वता, परसा भागवताचा उल्लेख, 'नामा म्हणे' हा तृतीय पुरुषी प्रयोग, त्यांतील हास्यास्पद विसंगति इत्यादि सबळ पुराव्याच्या आधारावर असाच निष्कर्ष काढणें भाग पडतें की 'तीर्थावळी' ही ग्रंथ नामदेवांनी लिहिली नाही.

नगरीच्या बाहेर एक गाव होतं. गावाजवळून एक ओढा वाहत होता. ओढ्या लागून एक आंबराई होती. आंबराईच्या सावलींत एक तुटकी पडकी झोपडी होती. झोपडींत साठा वर्षांची बुड्डी राहत होती. तिला तीन मुलं होतीं. मुलं फार हुशार होतीं दिवसभर कष्ट करीत. सायंकाळीं घरीं येत. दिवसामागून दिवस जात. रात्री मागून रात्री जात. मुलं कामधंदा करीत. ना कुणाशी खटखट, ना कुणाशी देवाण घेवाण. आपण भले, आपलें काम भलें, असा माउल्यांचा स्वभाव होता.

एके दिवशीं राजा शिकारीला गेला. घोर रान होतं. वाघ, सिंह, अस्वलं यांचंच राज्य. राजाबरोबर त्याचा प्रधान आणि कांही भालदार चोपदार होते. सकाळची संध्याकाळ झाली पण राजाला शिकार कांही सापडली नाही. अंधार पडूं लागला, तेव्हा प्रधान म्हणाला, "महाराजाधिराज, आता रात्र होत आली आहे, चला परत जाऊं या." राजा म्हणाला, "प्रधान, शिकार सापडल्याशिवाय कसा बरं परत जाऊं ? या आयुष्यांत मी शिकारीला निघालों आणि शिकार सापडली नाही असं कधी घडलं नाही. मग आज असं कां बरं घडलं ?" प्रधान हात जोडून म्हणाला, "महाराज, आज आपला व्रताचा दिवस. या दिवशीं कशी शिकार मिळेल ? चला, परत चला." पण राजानं आपला हेका सोडला नाही.

प्रधानानं राजाला एका झाडाखाली नेवून म्हटलं, "महाराज, ही जागा बरी दिसते. आपण आराम करा. तोंपर्यंत आम्ही पहारा देतों." आता राजा आराम करण्यास त्या झाडाच्या बुंध्याशीं बसणार इतक्यांत वाघोबाची आरोळी ऐकूं आली. राजा तडक उठला व धनुष्यबाण घेऊन वाघाकडे धाव घेणार तोंच त्याच्या छातीला कळ लागून त्यानं, "प्रधान, धावा !" अशी किंकाळी फोडली ! प्रधान धावला, भालदार चोपदार धावले. त्यांनी राजाला उचलून पुनः झाडाखाली आणलें. करतां येईल तेवढे इलाज केले, पण राजाची कळ बसली नाही. उलट ती वाढून राजा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विव्हळूं लागला. प्रधानानं गडीमाणसांना ताबडतोब नगराकडे पाठवून धन्वंतरीला बोलावून आणण्याचा हुकूम सोडला.

मध्यरात्र झाली. राजाचं दुखणं कांही केल्या थांबेना. राजा सारखा ओरडत होता. धावा, धावा ! मला वाचवा ! धन्वंतरी आला. त्यानं जडीबुटी उगाळून राजाला दिली. तरी कळ बसेना. मांत्रिक आले. त्यांनी अनेक मंत्र मारले. पण कळ कांही थांबेना. इतक्यांत आकाशवाणी ऐकूं आली, "राजा, तुझ्या नगरींत सुख–शांति आहे. तुझ्या नगरींत कोणी गरीब नाही, कोणी दुखी नाही. पण राजा, तुला स्वतःला समाधान नाही. तुला पुत्र नाही आणि पुत्र नाही म्हणून चमन नगरीचा पुढे कोणी वारसदार नाही. तुला वारसदार प्राप्त झाला पाहिजे. पण त्यासाठी तूं या दुखण्यांतून उठला पाहिजेस. परंतु हें दुखणें वैद्याकडून, धन्वंतरीकडून किंवा मांत्रिकाकडून बसणें शक्य नाही. आज तुझ्या व्रताचा दिवस. या दिवशीं तरी तुझ्या हातून पशूची शिकार करण्याची इच्छा होणें व त्यासाठी तूं धडपडणें हाच मोठा तुझा अपराध आहे. परंतु आतापर्यंत तूं जें पुण्यकाम केलेंस तें पाहून या दुखण्यांतून उठण्यास आता तुला एकच उपाय आहे. तो उपाय ऐक. येथून पूर्वेच्या दिशेला जेथे सात डोंगर एकावर एक उभे आहेत, त्याच्या टोकावर एक शिवमंदिर आहे. त्या मंदिराच्या पुढे एक मोठा ब्रम्हवृक्ष आहे. त्या झाडाच्या वरच्या फांदीला एकच ब्रम्हफूल आहे. तें फूल आणून तूं हृदयाशीं धरशील तर तुझं दुखणं जाऊन तूं पुत्रफलहि प्राप्त करशील. तेव्हा राजा, हें अवघड काम केवळ पुण्यवान आहे तोच साध्य करूं शकेल ! नाही तर राज्याचा नाश होईल ! " या आकाशवाणीनं सारं रान दुमदुमून गेलं. सर्वजण घाबरून गेले. पशु–पक्षी आक्रोश करूं लागले. झाडंझुडपं, लतावेली, फळंफुलं कोमेजून गेलीं. नगरभर व आसपासच्या सर्व टापूंत अवकळा पसरली.

दुसरे दिवशीं राणीनं ताबडतोब आसपासच्या टापूंत दवंडी पिटविली. जो कोणी सात पहाडावरील ब्रम्हझाडाच्या शेंड्यावरील फूल आणील त्याला चमन नगरीचं राज्य बक्षीस देण्यांत येईल. सगळीकडे चर्चा सुरू झाली. प्रत्येक जणूं स्वतःला पुण्यवान समजत होता. प्रत्येकाला यशाची आशा वाटूं लागली. जो तो ब्रम्हफूल आणण्याची चुरस करूं लागला. कितीतरी लोक पहाडाच्या पायथ्यापर्यंत कसेबसे जात आणि मग डोंगराचं कडं, उंचच उंच आभाळाला भेदणारं तें टोक पाहून हताश होत व परत येत. त्या सात डोंगरांच्या आसपास ब्रम्हझाडासंबंधी चमत्कारिक गोष्टी कळूं लागत. कोणी म्हणायचा डोंगराची चढण चढायला सुरवात झाली की माणूस दगड होऊन पडतो. कोणी म्हणायचा, डोंगर चढतांना चारी बाजूला फार मोठी गुहा आहे व पावलापावलावर नागोबा फणी काढून पहारा देत असतो व तो वर चढणाऱ्याला दंश करतो. कोणी म्हणायचा, डोंगराच्या वर चढतांना हिरेमाणकांनी मढवलेलं एक दार आहे व तेथे एक सुंदर मुलगी बसली असते. ती डोंगरावर येणाऱ्याला आंत घेऊन जाते व मग तो आंत जाणारा गृहस्थ कधी परत येत नाही. त्याचं नंतर काय होतं कुणाला ठाऊक ! अशा शेकडों कथा सांगितल्या जात व मग जाणारे कच खाऊन मागे परत येत.

दिवसामागून दिवस लोटत होते. हिम्मत बांधून कोणी ना कोणी डोंगडाकडे जायचा आणि परत यायचा. कांही तर मध्येच वाटेंत मृत्यूमुखीं पडत. रोजच्या रोज राजा खंगत होता. त्याच्या वेदना वाढत होत्या. आपल्याला सगळं राज्य मिळेल या आशेनं, या मोहानं जे जे डोंगराकडे जात त्या सर्वांची दुर्दशा होई व नंतर त्यांच्या दुर्दशेच्या भयंकर वार्ता ऐकायला मिळत. त्यामुळे तर आणखी दुसरेहि लोक घाबरून जात.

ऐके दिवशीं आंबराईंतील मुलें कामावरून घरीं आलीं. सायंकाळ झाली होती. मुलांनी हातपाय धुतले तुळशीवर जळती दिवटी ठेवली आणि मग नैवेद्यासाठी आईला हाक दिली. पण त्यांची आई झुऱ्यामुऱ्या गोधडी पांघरून माजघराच्या कोपऱ्यांत बसली होती. मुलांच्या हाकेला तिनं ओ दिली नाही. मुलं काय झालं म्हणून तिच्याजवळ गेलीं. तिच्या कुशीला बिलगलीं आणि आमच्या हातून काय अपराध झाला म्हणून काकुळतीनं विचारूं लागलीं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आईनं त्या मुलांच्या चेहऱ्यावरून आपली क्षीण नजर टाकली. मग मुलांना कवटाळून गहिवरून म्हणाली, "बाळांनो काय सांगूं तुम्हाला ? देवाच्या कृपेनं तुम्ही सुखी आहांत पण तुमचा राजा सुखी नाही. राजा सुखी नाही म्हणून राणी दुःखी आहे, प्रजा दुःखी आहे. सर्व राज्यांत दुःख पसरलें आहे.

"मग आई तूं आज्ञा कर, काय करावं आम्ही ?" मोठा मुलगा म्हणाला.

"तूं जसं सांगशील तसं करूं." दुसरा मुलगा म्हणाला.

"तूं सांग आई, म्हणशील तर आपल्या राजासाठी प्राण देऊं." तिसरा मुलगा म्हणाला.

"शाब्बास माझ्या लेकरांनो !" म्हाताऱ्या आईनं मुलांना छातीशीं धरून आनंदानं उद्गार काढले. तिच्या डोळ्यांतून अभिमानानं अश्रू ओघळले. नंतर म्हातारी आई म्हणाली, "आज दुपारीं मला डोळा लागला आणि एक स्वप्न पडलं. एकावर एक असलेले मला ते डोंगर दिसले; डोंगरांवरील तें देऊळ दिसलं. देवळापुढील ब्रम्हझाड दिसलं अन् माझी नजर त्या झाडाच्या शेंड्यावर गेली. एकच एक फूल तेथे चमकत होतं. त्याचा प्रकाश आजूबाजूला पडला होता.'

म्हातारी थोडा वेळ थांबली. मुलं टक लावून आईकडे पाहत म्हणालीं, "मग काय झालं आई ?"

म्हातारी पुढं सांगूं लागली, "देवळाच्या चवुतऱ्यावर एक म्हातारा पुजारी बसला होता. त्याच्या समोर पंचारती होती. पंचारतींत वाती जळत होत्या. बाजूला एक गाय होती. दुसऱ्या बाजूला नाग डुलत होता. म्हातारा ओंजळींत फूल घेऊन मजकडे पाहून म्हणाला, "या देवळांत आजपर्यंत कोणी आलं नाही; पण आता तूं आलीस. तुला ब्रम्हफूल मिळणारं नाही. जा, परत जा आणि आपल्या पुत्रांना पाठव. त्यांना हें फूल प्राप्त होऊं शकेल; पण लक्षांत ठेव या डोंगरावर जिकडे तिकडे सोनं, चांदी, हिरे, माणिक, मोती आहेत. आजूबाजूला सुंदर सुंदर अप्सरा शृंगार करून फिरत असतात. तुझीं मुलं मोहाला बळी पडलीं की जागच्या जागीं दगड होऊन पडतील आणि तुझी पुण्याई नष्ट होईल !" मी हात जोडून परतलें तोंच तो म्हातारा पुजारी पुन्हा म्हणाला, "डोंगराच्या पायथ्याशीं पूर्वेच्या बाजूला एक झरा आहे. झऱ्याला लागून बेलाचीं तीन झाडं आहेत. मधल्या झाडाला एक दगड टेकला आहे. त्या दगडाच्या खाली एक निळा मणी आहे. तो मणी घेऊन डोंगरावर चढण्याची शक्ती येईल. परंतु तो हरवला तर मनुष्य प्राणाला मुकेल व मणी जागच्या जागीं परत जाईल. जा आता." इतक्यांत माझे डोळे उघडले. चिमण्यांनी माझ्याजवळच्या सुपांतील तांदळावर चिवचिवाट केला नसता तर माझ्या स्वप्नाचा भंग झाला नसता. पण झालं तें बरंच झालं. चिमण्यांनी मला जागं केलं हा शुभ शकुन आहे !" स्वप्न सांगून झाल्यावर म्हातारी म्हणाली, "बाळांनो, राजाला वाचवणं आपला धर्म आहे. राजा वाचला, सुखी झाला तर सर्व प्रजा सुखी होईल. तेव्हा सांगा. तें ब्रम्हफूल आणण्याची कोणाची तयारी आहे ?" मोठा मुलगा म्हणाला, "माझी." दुसरा म्हणाला, "माझी" आणि तिसराहि म्हणाला, 'माझी तयारी आहे.' आई म्हणाली, "लेकरांनो, तुम्ही तिघेहि जा. पण ब्रम्हझाडाचें तें फूल घेऊनच परत या. पण तोपर्यंत मात्र मला तुम्ही तोंड दाखवूं नका."

आईच्या आज्ञेप्रमाणे तीं तिघंहि मुलं दुसरे दिवशीं अगदी सकाळीं त्या सात डोंगरांकडे निघालीं. आईनं हसतमुखानं त्यांना आशीर्वाद दिला.

मुलं शोध करीत करीत पूर्वेकडील त्या डोंगराच्या झऱ्यापाशीं आलीं. त्यांना बेलाचीं तीन झाडं आढळलीं व मधल्या झाडाला टेकलेला तो दगड दिसला. मोठ्या भावानं तो दगड बाजूला सारला. तेव्हा चकाकणारा एक निळा मणी त्यानं पाहिला. तो हातीं घेतांच बेलाच्या त्या झाडांतून ध्वनि निघाला, "सांभाळ बरं हा मणी ! दुरुपयोग करूं नको. तुला एकट्यालाच डोंगरावर गेलं पाहिजे; आणि सूर्य मावळण्याच्या आधी पायथ्याशीं परत आलं पाहिजे. चल पुढे जा."
ह्या आदेशाप्रमाणे मोठा भाऊ पुढे चालूं लागला आणि त्याचे दोघे भाऊ घरीं परत आले व आपल्या वडील भावाची आतुरतेने वाट पाहूं लागले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अंधार पडूं लागला तरी वडील भाऊ परत येईना. आजीनं दुसऱ्या मुलाला आज्ञा केली. तो त्या बेलाच्या झाडाजवळ गेला. त्यानं दगड बाजूला सारला. तोच निळा मणी हातीं घेऊन तो पुढे निघाला. पण हा दुसराहि भाऊ वडील भावाप्रमाणं रात्र पडली तरी परतला नाही. शेवटीं पहाट होत आली. तेव्हा म्हातारी आई छोट्या मुलाला म्हणाली, "बाळ, आता तूं कुणाची वाट बघतोस? चल तयारी कर." या छोट्या मुलानं आंघोळ केली. देवपूजा केली. गाईला टिका लावला आणि आईच्या चरणावर डोकं ठेवलं. आईनं त्याला आशीर्वाद दिला. मग तो त्या सात डोंगराच्या वाटेला लागला.

तो घरून तडक निघाला. त्याने इकडे तिकडे कुठंहि पाहिलं नाही. सरळ त्या दगडाखालील मणी घेऊन व देवस्मरण करून तो डोंगर चढूं लागला. त्याच्या डोक्यासमोर आईनं स्वप्नांत सांगितल्याप्रमाणं सोनं, चांदी, हिरे, माणिक, मोती यांच्या राशी पडलेल्या होत्या. प्रत्येक झाड सोन्याचं, होतं. त्याला हिरे, माणिक, मोती लटकत असल्याचें दिसत होतें. पण तो सरळ सरळच जात होता. वाटेंत त्याला एक सुंदर भव्य दरवाजा लागला. तेथे एक रूपवान तरुण मुलगी शृंगार करून बसली होती. ती त्याला पाहून धावत पुढे आली व त्याला बिलगूं लागली. परंतु तिच्याकडे न पाहतां, तिला जोराने झिडकारून तो त्या दरवाजापुढील गुहेंत शिरला. तिथंहि त्याला अनेक सुंदर तरुणी मोह पाडूं लागल्या, पण त्याने आपला सरळ मार्ग धरला. थोड्याच वेळांत तो त्या मंदिराच्या पायथ्याजवळ आला. पायरीवर पाऊल ठेवतांच सर्वत्र घंटानाद, शंखध्वनि होऊन त्याचेवर पुष्पांचा वर्षाव झाला! मंदिरांतील पुजारी हात जोडून सामोरा आला. त्यानं त्या मुलाला वंदन केलं. मुलगा त्या ब्रम्हवृक्षाखाली उभा झाला व त्याने विनम्रतेने हात जोडले. तोंच ब्रम्हझाडावरील तें एकुलतें एक फूल गळून त्याच्या ओंजळींत पडलें. तेव्हा ब्रम्हवृक्ष म्हणाला, "मुला, तूं फार भाग्यवान आहेस. तुझ्या घराण्यांतील पुण्याईमुळे तुला मी माझं आवडतं फूल दिलं आहे. या फुलानं चमन नगरीचा राजा बरा होईल व त्याला पुत्रप्राप्तिहि होईल. जा तुझं कल्याण होईल!" मुलगा ब्रम्हवृक्षाला प्रणाम करून परत जाणार तोंच पुनः ब्रम्हवृक्ष म्हणाला, "मुला थांब. पुजारी तुला प्रसाद देईल तो जातांना घेऊन जा. तो प्रसाद तुझ्या गरीब व पवित्र आईचा आहे. या प्रसादानं तुझे दोघे पुण्यवान परंतु मोहाला बळी पडलेले भाऊ जिवंत होतील. हें फूल तुला जातांना तुझ्या दगड होऊन पडलेल्या भावाकडे घेऊन जाईल. त्यावर हा प्रसाद ठेव म्हणजे तुझी व त्यांची भेट होईल. जा, मुला जा. आणि सुखी हो."

ब्रम्हफुलाच्या इच्छेप्रमाणं सर्व कांही घडून आलं. त्याचे दोघे भाऊ जिवंत होऊन त्याला भेटले. मुलाने राजाला तें फूल देऊन त्याला दुःखांतून मुक्त केलं! चमन नगरींत आनंदीआनंद झाला. राजा–राणी खूष होऊन त्या मुलाला छातीशीं कवटाळून म्हणाले, "मुला, तूं माझ्या पुत्रासारखाच आहेस. राणीनं जाहीर केल्याप्रमाणं चमन नगराचं सर्व राज्य घे, व सुखानं राज्य कर." तेव्हा मुलगा राजाला वंदन करून म्हणाला. "राजाधिराज, तुमचं राज्य तुम्हाला लखलाभ असो! मी कष्ट करूनच आपल्या तुटक्या पडक्या झोपडींत गरिबीनं आयुष्य भोगीन. आपला कृपालोभ असूं द्या म्हणजे झालं!"

इतक्यांत पुनः आकाशवाणी झाली··· "मुलाचा जयजयकार असो. त्याच्या पवित्र झोपडींत सदा पावित्र्य आणि पुण्य नांदो!"

राजा-राणीनं आणि सर्व प्रजाजनांनी त्या मुलाला लवून प्रणाम केला. आणि तें ब्रम्हफूल त्याच्या डोक्यावर चमकूं लागलं!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांताच्या इतिहासाचीं साधनें

ग्रामजोशी घराण्यांतील कागदपत्रें

संशोधक : शंकर गोविंद चट्टे, एम्. ए., शास्त्री

(१)

ई श्री सकलगुणसंपन्न सौजन्यार्द्रबुद्धि उपकारमूर्ति महादेऊ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजेमानी राजेश्री बावजी व विठोजी गोविंद हवालदार व गो‥त मामले नागपूर प्रति विश्वासराये आसीरवादु अनुक्रमें नमस्कार येथील क्षेम (जा)णुनु आपले क्षेम लिहिणे ‥सी याची वृत्तीची भूमि कदीम आहे ते माने याहाचे दुमाला करणे पेस्तर झी(कर) येऊ न देणे. हे भूमी तुमचे वि‥येळ तरी आम मेहेर व कोंडमेहेर जे‥हातती आहेत ते देणें ब्राम्हणाची ब्रुत रफार न करणें.

श्री

यादवंश राज्याहीचा सन फसली

भोसले राहणार कोकणात भैरवगडी सिसोदे क्षत्रिये याहास म्हणावे

१०६९ रुपाजी व मुधोजी भोसले उभयेता बंधु

१०६९ प्रतापगडी राहणार शिवाजीराजे सेनासाहेश्री

१ मुधोजी सेनाधुरंधरचे पुत्र ३ बापूजी १ व परसोजी १ व साबाजी १ –१०८४ स काम झाले

१०९० सिवाजी शांत जाले राजे याचे पुत्र संबाजीराजे व पुत्र रामराजे

१०९८ संबाजी राजे सेनासाहेब शांत जाले

११०५ रघोजी भोसले याहाचा जेनम झाला. सन ११२७ साचे सालीं दिल्लीस गेले

१ बापूजीचे पुत्र ३ बिंबाजी व संताजी दिल्लीस गेले व राणोजी उंबरावतीकर. बिंबाजीचे पुत्र रघोजी भोसले जलम ११०५

११०८ संबाजीचे पुत्र एक. रामराजे याचे पुत्र सिवजी राजे

१ सिवजीराजे सेनासाहेब सुभा याचे पुत्र शाहुराजे.

१११६ औरंगजेब पातशहा निमाले

१११७ शाहुमहाराज राजे छत्रपति याहास गादी होऊन पटाभिषेक जाला. वैशाख शु॥ ९ मी शनवारी

१ परसोजी पुत्र कान्होजी सेनासाहेब सुबा

११२८ साचे सालीं रघोजी दिल्लीस जाऊन आले

११४४ साचे सालीं रघोजी भोसले देऊळगावी आले. कार्तिकमासी तेथेच पुत्र जानोजी जलमले असे ६ दिवसा

११४६ आणि मुधोजी ११४४ वैशाखांत जलमले व बिंबाजी ११४८ साबाजी ११४६

११४७ साचे सालपावेतो वऱ्हाड सर केले ते वेळेस नागपूरचे गोंडराजे याहासी आपसात खिसा मचून मीरबहादर मारला पडला हे समजले. पत्रात पाहून मतलब जाणून सबब येऊन लिहिले घेऊन अकबरशा व बुराणशा आपले हस्ते स्थापिले नागपुरी

११४८ चे साली पोवनी वगैरे बुदेलखंड सर केले आणि भोवताल पावेतो सर केले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

११४९-५० साचे साली बुराणशासी लढाई करून अकबरशा पळाला. ब्रम्हपुरीवर लढाई

पुरवणी बंद १

११५० साचे साली ज्याहांदरशा भंडालेवाला मारून अमल केला पाटणसावंगीहि गोंड मारून घेतली आनि झाडी सर केली

११५१ चे साली मुलुक सर करून नागपुरी राहते जाले रघोजी बुवासाहेब नागपुरी राहते जाले

११५२ चे साली बंगाला सर कराये निमित्त गेले. तर छत्तिसगड १ रतनपूर १ करणाटक १ वगैरे दाम्ही घेतले.

११५३ चे सिन्हस्तास जाऊन मुर्शिदाबाद घेऊन जगतशेटाची खोटी लुटली आणि कलकत्याचे हुगळीस ठाणें वसविले आणि बस्तर घेतले आणि बाराभाटीचा किल्लाहि घेतला आणि बंगालहि घेतले आणि जगन्नाथपुरी सर केली.

११५५ साली बाबासाहेब गेले रघोजी

११५८ चे साली रघोजीबाबा सातान्यास जाऊन शाहु छत्रपतीशीं भेट घेऊन पुन्हा नागपुरास स्वस्थानी आले.

११५९ फसलीचे साली शाहुमहाराजास देवाज्ञा जाहाली.

११५९ चे साली रघोजीबाबाची माता कासीबाईस देवआज्ञा जाली ते वेळेस धोडभट व बाबाभट बोलले की आम्ही तुम्हा समागमे नागपुरास येतो (चांद सुलतान याचा पुत्र मीरबहादर नागपूरचे किल्ल्यांत पडला. वलीशहाचे लेक नंतर राजे झाले अकबरशहा व बुराणशहाचे लिहिले घेऊन स्थापिले सन ११४५)

पुरवणी बंद २

११५९ फसलीचे साली भवानी नागनाथ मुनशी याने चंद्रपूरचे तहाचे पत्र फारशी लेहून पाठविले जानोजी बाबाकडे ... आणि उडया मुलुक घेतला जानोजीने घेऊन पुन्हा नागपुरास आले विजयी होऊन. बाबासाहेबास भेटले.

११५९ चे सालीं चंद्रपूर घेऊन गिरिडावर येऊन चिमणागोंदा मारून गिरड घेतले आणि नागपुरास आले.

११६० चे साली दक्षिणेचा सुभा नासेरजंगासी व मोहदीखान पठाणासी फुलचिरीचे मयदानांत लढाई घेऊन नासेरजंग मेला हे जाणोन मुगलाईत रघोजीन डवल टाकला जपतीचे ठाणें वसविले आणि पठाण पळाला.

११६१ चे साली जानोजी व मुधोजी मुगलाईत जाऊन विजेयेदुर्गाकडे पाठवून ठाणी घेतली.

११६२ चे साली मुगलापासोन विडा घेऊन शहानवाझखान पठाण पोवनारवर येऊन व रघोजी इकडोन जावोन लढाई मोगलासी व भोसल्यासी जाल्यानंतर नेम ठहरून सला जाला आणि मोगल माघारा फिरविला. तितक्यांत जानोजी व मुधोजीहि येऊन पोहचले पोवनारी. नंतर सर्वत्र नागपुरास आले.

११६३ चें सालीं रघोजी बाबाजी उमर अठावण ५८ वर्षाची उमर जाली ते साली तेरा बायेका १३ व ४ पुत्र व सुना वगैरे परिवारे रामक्षेत्रास जाऊन रामचंद्राच्या मूर्ति गडावरी स्थापिल्या ते वेळेस रामटेक कसबे वगैरे प्रगणा शासनाऐवजी सर्वत्रास देला आणि जानोजी ३ बायका साबाजी ३ बायका सहोदर मुधोजी बायका २ व

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विंबाजी बायका ३ सहोदर ऐसे चौघे बंधु व रघोजी बाबा हे सर्वत्र नागपुरास आले.

११६४ चे साली नंतर फाग शुद्ध त्रिति' व पाठीयाचे आजाराने रघोजीबाबा शांत जाले आणि सात स्त्रियांनी सहगमन केले. नंतर चैत्र शुद्ध १ प्रतिपदा जानोजी बाबास पटाभिषेक करुन गादीवर बसविले. मुधोजी व जानोजी उभयतासी समरांगण काटेपूर्णा नदीचे तिरी वऱ्हाडांत करीत जाले ते वेळेस शिकस्त होऊन मुधोजी पुण्यास गेले आणी

११६५ चे साली जानोजीबाबा जाता वेळेस मुगलाईतून खंडणी घेऊन फौजे करिता चालला ते वेळेस शोकजंगास कलावा पुण्यास घेऊन गेले निजाम अलिखान दक्षणचा मुख्य पातशा यासी लढाई करुन पंचवीस लाखाचा मुलुक घेऊन तेथे मुधोजी व जानोजी उभयताचा लढा मिटला.

११६६ चे सालीं जानोजीबाबास सेनासाहबीचे वस्त्र दिले आणि दिवाकर पुरुषोत्तम यास बिदा केले.

१ साबाजीकडे दारव्हा वगैरे १७ महाल नेमणूक ठरली.

२. मुधोजी बाबास सेनाधुरंधरीची वस्त्रे देऊन चांदे व छत्तिसगड हे नेमणूक देऊन सुभे दोन याचे पोटात बिंबाजी भाऊ सहोदर नेम ठहरला. सेनासाहेबास बाकी सर्व मुलुक वहाल राजा जानोजी सेनासाहेब सुभा याहाने मुलकाचा केला बंदोबस्त. गायेलचे किल्ल्यावरी नेमला झामसिंग. नंतर तेथोनि आले वरधा नदीचे तिरी. प्रगणे सीरपूर वणी तेथे उभयता बंधूचा वाहाडला विरोध. सेनाधुरंधर मुधोजी चंद्रपूरचे किल्ल्यात घसला. ते समयी सेनासाहेवाने जानोजीने तोफेचा मोर्चा लाविला. जाला त्या किल्ल्यासी पाचवे दिवसी मुगलाचा दिवाण विठ्ठल राजाबहादर उभयता बंधूसी सला समजुनीचा करता जाला. नंतर सेनासाहेब नागपुरासी आला आणी राज्याचा बंदोबस्त करू लागला. तो जानोजीराव व बाबूजी कोन्हेर व चितपावन मंडळी व पिराजी नाईक निंबाळकरांनी तलत्रेच्या निमित्तानी बखेडा मचविला. ते करता नसावा चोरघोडा. नाहीतर चाळीस लाखाचा आणा तोडा. तेव्हा आमची गोष्ठ मोडा. चोर घोड्याविसी सेनासाहेब पडले संकष्टी. चोरघोडा म्हणे नोका होऊ तुम्ही कष्टी. रुपये मी दिले याची मुष्ठी निंबाळकर काहडोन द्यावा नंतर दिवाकर पुरुषोत्तम याने चिताजी गडकरीची चिठी देणे ४० लाखाचा निशाने लावून देल्ही. त्यानी निंबाळकर काहडून दिला. निंबाळकर नेम ठहरविला जे करार जो कोण्ही येईल निंबाळकर १०० स्वारा अधिक चाकर कोण्हास ठेवू नये. चोरघोडा स्वस्त जाला. करु लागला कारभार. बिंबाजी सकुटुंब गेले रायपुरी. छत्तिसगडचे राज्यकारभार करी. मुधोजी भोसले सपरिवारी चंद्रपुरी राहते जाले साबाजी आपले कुटुंब सुद्धा दारव्हयास जाते जाले नंतर मात्राभावात बाधा जानोजी राज्यांत कधी जाली नाही.

११६८ ते वाहै लेखणीला मू. दर्याबाईचा बल्लभु जानोजीराव.

श्री असल प्रो नकल



महाराजाधिराज राजेश्री राणी शामकुवरजी महिपतिरायें देवराजे गोसावी ये ते चिंतामण जोसी मामले नागपूर तुम्हास जितेदान पेठ कर्णादपूर जो सुदामत प्रो दर ।। रुके तीन॥॥ आहे तो खाणे, स्नानसंध्या करणे आसीरवाद देत जाणे पटा सही १० शुद्ध फाग संवत १७६०



ई माहाराजाधिराज राजेश्री (केसो) बाजी महिपतीराये देवराजे गोसावी मुकुंद जोसी व नारायण जोसी वृत्तेस्वर कसबे नागपूर पटा लिहून दिधला ऐसा जे तुम्हाबाबे ठाकूर हरहरराये छगलिया हुजुर येऊन्...... कदीम जोसी वृत्तेस्वर आहे. याची वृत्ति गाऊ मोकासा देने म्हणोनु विनंती केली ते परिसोन तुम्हास वृत्ति गाऊ मोकासा मौजे सुकळी म।। गाऊ एक जाटपैकी म।। दिधला असे. व नवा तेलियाचा घाणा येक जोसीपणाची आवणूक करून खाणे गावगन्ना जो काही कदीमपटा आहे तो खाऊन् दिवाणास आसेरवादु देत जाणे तुमचे जोसीपणाचे आदबास कसबा व गावगना जो कोन्ही आटक हुजती हिसा हरकती करील त्यास बादल होईल आपले केले पावेल कौल हुजुर ठाकूर हरहरराये छगलिया बसवंतराये उवीने गी० ते।। १० सुध माहे भादेऊ सं।। १७०२ वरिखे.

श्री लक्ष्मीकांत

राजश्री सरकार नी मोरवे वसी (?) याहासी

ई अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नें।। जानोजी भोसले सेनासाहेब सुभा दंडवत सुभे खलास सीतैन मया व अलफ वेदमूर्ति हीरभट जोसी कजबें नागपूर याची जोसपणाची वृत्ति को। मजकूरची पुरातनपासोन आहे त्यास सरकारात लग्न मुहुर्त जेपजाप्य वगैरे सरकारचे शागीर्द पेशाचे लग्न मुहुर्त होते त्याची वृत्ति मिळत नाही म्हणोन विदित जहाले तरी तुम्ही याचे वृत्तीस मुजाहीम न होणे पुरातनपासोन याचे जोसपणाचे वृत्तीची जे वावत आहे ते चालूं देणे यें विसी फिरोन बोभाटा येऊ न देणे जाणीजे छ १२ माहे रजब बहुत काय लिहिणे मोर्तबसुद.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अभिप्राय

सत्यवादी

(संपादक वा. रा. धुळेकर)

महानुभावीय वाङ्मयाचें प्रकाशन व पंथाचा पुरोगामी दृष्टीने विचार या उद्देशांनी प्रस्तुत मासिक काढण्यांत आलें आहे. बोरगांवसारख्या शहरापासून दूर असलेल्या ठिकाणावरून केवळ पंथीय दृष्टीने हें मासिक काढण्यांत आल्यामुळे अर्थातच वाचकवर्ग मर्यादितच असणार! तथापि या मासिकांतून जे महानुभवीय प्राचीन ग्रंथ प्रसिद्ध होत आहेत, त्यामुळे पंथियांप्रमाणेच मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांनाहि तें उपयुक्त होईल.

सत्यवादीच्या ह्या अंकांत कृष्णराज महानुभाव यांचा पंथाच्या दृष्टीने विचारपूर्वक लेख आलेला आहे. डॉ. मा. गो. देशमुख यांनी शिशुपालवधाच्या शके १४४५ मधील हस्तलिखिताचा परिचय करून दिलेला आहे परंतु ह्या हस्तलिखिताचें प्राचीनत्व भानुविजया-सारखें न ठरो म्हणजे झालें. महानुभावीय ग्रंथाचें प्राचीनत्व केवळ शकावरून ठरविणें धोक्याचें असतें. असो. प्रस्तुत मासिकांतून महानुभाव तत्वज्ञानाचे प्राचीन ग्रंथ जर प्रसिद्ध केले तर पंथाचें स्वरूप कळून लोकांचे बरेच गैरसमज दूर होतील.

बलिदानाच्या पायघड्यावर

बलिदानाच्या पायघड्यावर
धैर्य धरुनि जे नित्य चालती
नव्या जगाचे हो निर्माते
नव इतिहासा लिहुनी जाती—

अव्यक्तांतुनि व्यक्त शोधती
लाख दिव्यांना स्नेह पाजती
अन् त्यागाच्या ताडपत्रावर
सुवर्णाक्षरें लिहुनी जाती—

शोषित नित्य सुखाचीं मूल्यें
स्वतःच जे परमेश्वर असुनी
अहंपणाच्या करुनि खडावा
लीन सदा जे भक्तगणांहुनि—

नव्हेत केवळ शब्द विधाते
स्वयंसुखाची देत आहुती
प्रतिशब्दाला फेडित वाचा
उजाड धरति जे पालवती—

स्वर्ग जयाच्या पुढती उघडा
खुणावतो त्या 'या या,' म्हणुनी
तरिही निश्चल उभे विटेवर
बोलावित स्वर्गा धरणीवर—

—श्रीपाद गंगाधर कावळे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

नव्याने तयार करण्यांत यावयाच्या वि. सा. संघाच्या घटनेविषयी सूचना

विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांस सूचित करण्यांत येतें की विदर्भ साहित्य संघाच्या जुन्या चालू घटनेंतील त्रुटि दूर करण्याच्या हेतूने ती घटना बदलून संपूर्णपणें नवीन स्वतंत्र घटना तयार करण्याचें ठरविण्यांत आलें आहे.

त्या दृष्टीने ज्या सभासदांना नवीन घटनेंत ज्या सूचना करावयाच्या असतील त्या त्यांनी दिनांक १० जून १९५५ पूर्वी केन्द्रीय कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी.

(सही) ए. श्री. पटवर्धन
आमंत्रक,
घटनाविषयक प्रश्न समिति,
विदर्भ साहित्य संघ.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

परीक्षासमिति, विदर्भ साहित्य संघ

श्री. तु. ब. बोडखे यांची कार्यालय मंत्री म्हणून केली गेलेली नियुक्ति ही वैतनिक नसून अवैतनिक आहे. त्याचप्रमाणे ते परीक्षा समितीचे कार्यालयमंत्री म्हणून एक सदस्यही आहेत.

पां. कृ. सावळापूरकर
संचालक,
परीक्षा समिति, वि. सा. संघ.

वार्षिक कार्यक्रम १९५५

कार्यक्रम	सत्र १: ऑगस्ट ५५
(१) परीक्षा आरंभ तारीख	२० ऑगस्ट ५५
(२) केंद्रांकरिता आवेदन पत्रें	१५ जून ,,
(३) आवेदनपत्रें केंद्राधिकाऱ्याकडे पाठविण्याची अंतिम तारीख	५ जुलै ,,
(४) परीक्षा समितीकडे प. आवेदनपत्रें पाठविण्याची तारीख	१० जुलै ,,
(५) परीक्षाफल घोषित होण्याची अंतिम तारीख	१५ आक्टोबर ,,
(६) प्रमाणपत्रें प्राप्त होण्याची अंतिम तारीख	१ नोव्हेंबर ,,

(प्रा.) माणिक के. वैतुले,
कार्यवाह

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

केंद्रवृत्त नागपूर,

ल. वि. पांढरीपांडे,
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

कार्यकारी मंडळाची सभा

दि. १-५-५५ रोजीं सकाळीं ८-३० वाजतां संघाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली केन्द्रीय कार्यालयांत भरली.

प्रथम सरचिटणिसांनी दि. १७-४-५५ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

त्यानंतर समित्या उपसमित्यांची निवड करण्यांत आली.

प्रकाशन समितिः आमंत्रक : श्री. ल. वि. पांढरीपांडे; **सभासद**—डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. कृ. व्यं. पेशकार, श्री. दि. ब. पंडित; श्री. पु. वि. देशपांडे व प्रा. श्री. गो. काशीकर.

घटना विषयक प्रश्न समिति : आमंत्रक : श्री. ए. श्री. पटवर्धन; **सभासद**—श्री. बाबासाहेब खापर्डे; श्री. बाळासाहेब ढवळे; अड्. ए. ज. मोहरीर; अॅड्. अरविंद बोबडे; रा. सा. खं. के. रांगोळे; श्री. श. वा. रानडे आणि श्री. पु. य. देशपांडे.

साहित्य संस्था सहकार समिति : आमंत्रक : श्री. मनोहर खोलकुटे; **सभासद**—प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. माणिक के. वैतुले; प्रा. मधुसूदन अ. चान्सरकर; प्रा. या. मु. पाठक: श्री. य. ग. मालोदे.

पुस्तकालय समिति : आमंत्रक : श्री. ल. वि. पांढरीपांडे; **सभासद**—श्री. म. ता. सावजी; डॉ. वि. भि. कोलते; श्री. दि. ब. पंडित व श्री. ग. नी. भंवाळकर.

सीमा समिति : आमंत्रक : श्री. ए. श्री. पटवर्धन; **सभासद**—श्री. ब्रिजलाल बियाणी. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर; श्री. ना. य. डवीर; श्री. अेम्. आर. वाईकर; श्री. मा. त्र्यं धर्माधिकारी; श्री. शामराव पराते; श्री. राजाभाऊ महाजन व श्री. ना. रा. वामणगांवकर.

मंदिर रचना समिति : अध्यक्ष : न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति; **आमंत्रक**—श्री. नाना जोग; **सभासद** : श्री. फरजगांवकर; श्री. पु. य. देशपांडे आणि श्री. द. स. देशपांडे.

मंदिर निधि समिति : अध्यक्ष : न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति; **आमंत्रक** : श्री. बाबुराव चिमोटे; **सभासद**—श्री. य. शं. धर्माधिकारी, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर; श्री. ना. रा. वामणगांवकर, श्री. नाना जोग; सौ. इंदुमति शेवडे; सौ. पद्मावतीबाई चिटणवीस; सौ. कुसुमताई वानखेडे.

परिभाषा समिति : आमंत्रक : प्रा. मा. ल. व्यवहारे; **सभासद** : कविभूषण अण्णासाहेब खापर्डे; प्रा. भ. श्री. पंडित व प्रा. कृ. व्यं. पेशकार.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघशाखा घटना उपसमिति : आमंत्रक : श्री. द. रा. गोमकाळे, सभासद—श्री. पु. य. देशपांडे; श्री. व. बा. शब्दे; प्रा. मा. ल. व्यवहारे; श्री. ना. ग. इबीर; तु. ना. काटकर; श्री. प्र. वा. ऊर्ध्वरेषे.

भाषाविषयक संशोधन समिति : आमंत्रक : प्रा. सुरेश डोळके; सभासद—म. म. वा. वि. मिराशी; प्रा. पां. कृ सावळापूरकर; डॉ. शं. दा. पेंडसे; डॉ. वि. भि. कोलते; डॉ. मा. गो. देशमुख व प्रा. भ. श्री. पंडित.

नाट्य समिति : आमंत्रक : सौ. इंदुमति शेवडे; सभासद—श्री. वा. वा. भोळे, श्री. पां. बा. गडकरी; श्री. केशवराव केळकर; श्री. नानासाहेब जोग; श्री. पु. व्यं दारव्हेकर; श्री. द. रा. गोमकाळे; श्री. नानासाहेब ओगले; श्री. शं. ना. सहस्त्रबुद्धे; सौ. इंदुमति कोरके आणि सौ. अनसूया वाडेगांवकर.

आगरकर ग्रंथ लेखन समिति : आमंत्रक : प्रा. श्री. मा. कुळकर्णी; सभासद—सौ. विमलाबाई देशपांडे; डॉ. य. खु. देशपांडे; डॉ. मा. गो. देशमुख, आणि प्रा. पां. कृ. सावळापूरकर.

गडकरी स्मारक समिति : ही समिति गतवर्षी होती तशीच यावर्षीहि कायम राहील.

परीक्षा समिति : संचालक प्रा. पां. कृ. सावळापूरकर; कार्यवाह : प्रा. माणिक के. बेतुले; सभासद—प्रा. या. मु. पाठक, प्रा. दा. ल. अडोणी; प्रा. गो. मो. रानडे; श्री. द. शं. फडके; प्रा. सौ. उषाताई कोलते; श्री. दि. व. पंडित.; श्री. रा. पु. सगदेव; श्रीमती शकुंतलाबाई दिवाणजी; श्री. व. वा. शब्दे व श्री. तु. ना. काटकर.

सांस्कृतिक कार्यक्रम समिति : आमंत्रक श्री. रा. पु. सगदेव; सभासद—श्रीमंत अप्पासाहेब बुटी; प्रा. सौ. कुसुमताई मराठे; श्री. र. वि. कुळकर्णी; श्री. ना. हि. सोनबुले आणि श्री. शं. वा. फलटणकर.

युगवाणी संपादक मंडळ : श्री. दि. ब. पंडित; डॉ. ना. के. महाजन; श्री. तु. ना काटकर; श्री. म. अ. चान्सरकर; श्री. मा. नी. गलगलीकर आणि श्री. रा. ना. घाटोळे.

या सर्व समित्यांनी आपापलें कामकाज दर तीन महिन्यांनी कार्यकारी मंडळाला सादर करीत जावें असें सर्वानुमतें ठरलें.

त्यानंतर अमरावती शाखेचा प्रश्न विचारांत घेण्यांत आला. यासंबंधी अमरावती शाखेचें पुनरुज्जीवन करण्याच्या दृष्टीने प्रा. मा. ल. व्यवहारे अमरावती यांना अधिकार देण्यांत आले.

त्यानंतर श्री. नाना जोग यांच्या पत्रप्रकरणीं नेमण्यांत आलेल्या समितीच्या प्रतिवृत्तावर विचार करण्यांत येऊन ह्या समितीची पुनः रीतसर नेमणूक करण्यांत आली आणि ह्या समितीनें प्रश्नाबाबत तडजोडीचा पुनः एकदा प्रयत्न करावा असें बहुमताने ठरलें.

* *

सांस्कृतिक कार्यक्रम

सांस्कृतिक कायक्रम समितीतर्फे विदर्भ साहित्य मंदिरांत खालील कार्यक्रम करण्यांत आले.

गोमंतकांतील प्रसिद्ध साहित्यिक आणि सार्वजनिक कार्यकर्ते श्री. सां. घ. कंटक यांनी दि.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

८–५–५५ रोजीं सायंकाळीं ६–३० वाजतां विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. या प्रसंगीं 'गोमंतकांतील मराठीचें भवितव्य' या विषयावर त्यांचें भाषण झालें

दि. १४–५–५५ रोजीं सायंकाळीं ६–३० वाजतां कै. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची पुण्यतिथि साजरी करण्यांत आली. यावेळीं प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी कै. जांभेकरांच्या कार्याविषयीं भाषण करून त्यांना श्रद्धांजलि अर्पण केली.

दि. २२–५–५५ रोजीं सायं. ६३·० वाजतां टिमर्णीचे डॉ. वज्रप्रहार यांचें 'श्रीमद्भागवतावर मराठींतील महाकाव्य रचना' या विषयावर सुश्राव्य प्रवचन झालें.

* *

विदर्भ साहित्य संघाला देणग्या आणि भेटी

दानशूर श्रीमंत बाबुराव देशमुख यांनी मंदिर निधीसाठी दि. १९–५–५५ रोजीं रोख एकहजार रुपयांची (१०००) देणगी दिली. संघ या देणगीबद्दल त्यांचा ऋणी आहे.

मुंबईचे श्री. जे. एन. भिडे यांनी आपल्या नागपुरांतील वास्तव्याच्या स्मृतीप्रित्यर्थ दि. १८–५–५५ रोजीं रोख दहा रुपयांची देणगी दिली.

तसेंच श्री. वि. वि. पटवर्धन यांनी दि. ३–५–५५ रोजीं वाघाच्या जबड्यासह कातडें भेट म्हणून दिलें.

विदर्भ साहित्य संघ वरील देणग्यांबद्दल त्यांचा आभारी आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

१९५४-५५ सालचें कार्यवृत्त

(दि. २४-४-५५ रोजीं वार्षिक साधारण सभेंत मंजूर झालेलें कार्यवृत्त)

विदर्भ साहित्य संघाचें १९५४-५५ सालचें कार्यवृत्त आजच्या या सभेला सादर करतांना आनंद होत असला तरी हें वृत्त सभेपुढे मांडतांना संघाध्यक्ष कै. ह. ना. नेने यांच्या दुःखद निधनाचें स्मरण होऊन हृदय भरून येत आहे. कै. नेने यांच्या कारकीर्दींत अगदी प्रारंभीं, राष्ट्रपति डॉ. राजेन्द्रप्रसाद यांच्या हस्तें दि. २७ एप्रिल १९५४ रोजीं वि. सा. मंदिराचें मोठ्या थाटानें उद्घाटन होऊन, संघाचें सर्व कामकाज व्यवस्थित व पद्धतशीरपणे या साहित्य मंदिरांतून व्हायला सुरुवात झाली आणि विविध कार्यांना जोमानें चालना मिळाली. नवउत्साह व नवचैतन्य प्राप्त होऊन वि. सा. संघाची भरभराट करण्याची दिशा आखली गेली आणि त्या दिशेनें कार्य सफल करण्याचे यत्न कै. हरिभाऊंच्या नेतृत्वाखाली सुरू झाले. पण पुढे दि. २२-११-५४ रोजीं हरिभाऊंच्या आकस्मिक निधनामुळे दुःखाची छाया पसरली आणि जोम व उत्साह कांहीं काळ मन्दावला. पण नंतर, श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांच्यासारख्या ज्येष्ठ व श्रेष्ठ अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली वि. सा. संघांत पुनश्च नवचैतन्य निर्माण होऊन, वि. सा. संघाचीं कार्यें तितक्याच जोमानें व उत्साहानें सुरू झालीं.

विदर्भ साहित्य संघाचें १६ वें अधिवेशन प्रख्यात साहित्यिक प्रा. भ. श्री. पंडित यांचे अध्यक्षतेखाली दि. २५, २६ व २७ डिसेंबर १९५३ रोजीं खामगाव येथे न्यू इरा हायस्कूलच्या भव्य पटांगणांत भरलें होतें. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांनी दि. २१-३-५४ रोजीं केंन्द्रीय कार्यालयांत घटनेप्रमाणे भरलेल्या जुन्या व नव्या कार्यकारी मंडळाच्या संयुक्त सभेंत नवीन संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांना अधिकार प्रदान केलें.

सदस्य संख्या

वि. सा. संघाची १९५४-५५ सालची सदस्य-संख्या एकूण १३८२ आहे. त्यांत उपकारकर्ते ३, आश्रयदाते ८, सहाय्यक २, हितचिंतक १ आणि आजीव सदस्य १११ असून, साधारण सभासद १२५७ आहेत. यावर्षीं वि. सा. संघाच्या इतिहासांत सर्वांत जास्त सभासद झालेले आहेत. त्यावरून संस्थेची व्याप्ति दिवसेंदिवस वाढत आहे असें दिसून येईल.

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें संमेलन : अधिवेशन १७ वें.

श्री. ह. ना. नेने, संघाध्यक्ष यांच्या दि. २२-११-५४ च्या मृत्यूमुळे रिकामी झालेली जागा भरून काढण्यांत आली. दि. ५-१२-५४ रोजीं कार्यकारी मंडळाची सभा भरून घटनेप्रमाणे अध्यक्षपदासाठी श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांची एकमताने निवड करण्यांत आली. वि. सा. संघाचें संमेलन-अधिवेशन १७ वें नागपूरलाच दि. १९ व २० फेब्रुवारी १९५५ रोजीं श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखालीं साजरें झालें. या संमेलनाचें वृत्त व अध्यक्षीय भाषण 'युगवाणी'च्या मार्च ५५ च्या अंकांत प्रसिद्ध झालेंच आहे.

कार्यकारी मंडळ आणि साधारण सभा

या वर्षी कार्यकारी मंडळाने संस्थेची अन्तर्बाह्य सुधारणा घडविण्याचा प्रयत्न केला असून, वि. सा. संघाची शक्ति अधिक बळकट केली आहे. कार्यकारी मंडळाच्या वर्षांतून आठ सभा भरल्या असून, त्या सभांच्या कामकाजाचें वृत्त 'युगवाणीं'तून वेळोवेळीं प्रसिद्ध झालें आहे. मागील वार्षिक साधारण सभा दि. २९-४-५४ रोजीं भरली होती. तसेंच घटनेंत सुधारणा करण्यासाठी दि. १६-१-५५ रोजीं विशेष साधारण सभा आणि दि. २०-२-५५ रोजीं संमेलन प्रसंगीं साधारण सभा भरली होती. या सभांचें वृत्तहि 'युगवाणीं' तून प्रसिद्ध झालेंच आहे.

वि. सा. संघाची आर्थिक स्थिति

वि. सा. संघाने या वर्षी मराठी भाषेचें ज्ञान लाभावें म्हणून होणाऱ्या परीक्षा, बौद्धिक पातळी उंचावी म्हणून शैक्षणिक प्रगतीसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, तसेंच थोर साहित्यिकांच्या व पुढाऱ्यांच्या भेटी व भाषणें घडवून आणलीं. ग्रंथ-संपादनाच्या व संशोधनाच्या बाबतींतहि लक्ष पुरविण्यांत आलें. तद्वत्‌च 'युगवाणी' मासिक अधिक भरदार व वाचनीय करण्याची विशेष दखल घेण्यांत आली. या सर्व शैक्षणिक, सांस्कृतिक, बौद्धिक व भाषा आणि साहित्यविषयक कार्यासाठी वि. सा. संघाने अधिकाधिक रक्कम खर्च केली असून लोकसेवा साधण्याचा कसोशीने यत्न केला, हें १९५४-५५ सालच्या अंदाजपत्रकावरून व वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या कामकाजावरून स्पष्ट होईल. मागील वर्षापर्यंत मध्यप्रदेश शासनाकडून वि. सा. संघाला ५००० रु. चें अनुदान मिळत असे; पण या वर्षापासून ७५०० रु. चें उदार अनुदान सरकारकडून लाभलें आहे. वि. सा. संघ मध्यप्रदेश सरकारच्या या उदार अनुदानाबद्दल आभारी आहे. हें अनुदान विशेषतः भाषा, साहित्य, संस्कृति, संशोधन आदि कामासाठीच खर्च करण्याचा प्रयत्न केला जात असतो. वस्तुतः उल्लेखिलेल्या या उपयुक्त कार्याच्या पूर्तीसाठी अधिकाधिक अनुदानाची वि. सा. संघाची केव्हाहि अपेक्षा राहील. संस्थेची आर्थिक स्थिति लक्षांत घेऊन, अंदाजपत्रकाच्या मानाने काटेकोर खर्च करावा लागतो. त्यामुळे इतर आवश्यक कार्यासाठी रक्कम बरीच अपुरी पडते. विशेषतः शैक्षणिक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

कार्याच्या दृष्टीने विचार केला तर परीक्षा समितीचें प्रांतव्यापी कार्य वाढल्याने तिला नितांत गरज असूनहि तो खर्च भागवितां येत नाही व मंजूर झालेल्या अंदाजपत्रकांतील रकमेवरच कार्य आकुंचित ठेवणें भाग पडतें. पण यापुढे अशा योग्य कार्यासाठी अधिक खर्च करणें जरूरीचें आहे, हें यंदाच्या परीक्षा समितीच्या भरगच्च कार्य करूनहि आर्थिक अभावामुळे झालेल्या अडचणीवरून स्पष्ट होईल.

सोबत जोडलेल्या १९५४-५५ सालच्या जमाखर्चाच्या हिशेबाच्या तक्त्यावरून वि. सा. संघाच्या आर्थिक स्थितीसंबंधी यथार्थ कल्पना येईलच.

'युगवाणी' मासिक व संपादक मंडळाचें कार्य

या वर्षी सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. पु. य. देशपांडे यांच्या कुशल संपादकत्वाखाली 'युगवाणी' मासिकाने डौलदार व भरदार स्वरूप धारण केलें. विविध वैचारिक विषयावर तज्ज्ञ लेखकांचे लेख व नामवंत तथा उदयोन्मुख कवींच्या अर्थपूर्ण कविता आणि विचारपरिप्लुत टीकात्मक वाङ्मय यांनी 'युगवाणी'चा प्रत्येक अंक सजविण्यांत व त्याचा उच्च दर्जा अधिकाधिक वाढविण्यास संपादक मंडळाने यशस्वी प्रयत्न केले. कथादि ललित वाङ्मयापेक्षा वैचारिक तथा मीमांसात्मक लेखांना प्राधान्य देऊन अंक सदभिरुचिपूर्ण निघणें हें या वर्षाचें 'युगवाणी'चें खास वैशिष्ट्य होय. श्री. पु. य. देशपांडे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्री. गो. रा. दोडके, प्रा. के. ज. पुरोहित, पां. ब. गाडगीळ व श्री. ना. रा. शेंडे या संपादक मंडळाने जागरूकतेने अंक सजवून तो दर महिन्याच्या पहिल्या तारखेस सभासदांच्या हातीं पडेल याची दखल घेतली आहे. दुसरें असें की, या वर्षी मंदिर उद्घाटन विशेषांक, दीपावलि विशेषांक, कै. ह. ना. नेने विशेषांक आणि संमेलन विशेषांक असे चार विशेषांक जास्तीत जास्त भरीव मजकूर देऊन सभासदांना पुरविले आहेत. कै. भा. रा. तांबे यांच्या संबंधीचा एक उपविशेषांकहि सादर केला आहे. 'युगवाणी'चे असे एकूण बारा अंक नियमितपणे प्रसिद्ध झाले आहेत. व्यासंगी टीकाकार श्री. पां. ब. गाडगीळ व सुप्रसिद्ध लघुनिबंधकार श्री. गो. रा. दोडके यांचे श्रम विशेष आहेत. त्यांनी 'युगवाणी' संबंधीचें कार्यालयीन कामकाज सांभाळून 'युगवाणी'चा दर्जा राखला, यांत संदेह नाही. 'युगवाणी'चें मुद्रण अशोक मुद्रणालय व नारायण मुद्रणालय येथे झालें असून, त्या मुद्रणालयांचे व्यवस्थापक श्री. कुंडलराय मोहेकर व श्री. पां. ना. बनहट्टी यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

परीक्षा समितीचें महत्त्वपूर्ण व भरीव कार्य

परीक्षा समितीचें या वर्षाचें कार्य इतकें महत्त्वपूर्ण व भरीव झालें आहे की त्याबद्दल कोणालाहि अभिमान वाटेल. मागील वर्षी हें शैक्षणिक कार्य अडीच पटीने वाढलें होतें, तर यंदा त्याहिपेक्षा अधिकच होऊन प्रांतभर या कार्याचें लोण पोचलें आहे. कार्याचा विशाल व्याप व प्रगति लक्षांत घेतां परीक्षा समितीचे कर्तव्यदक्ष संचालक प्रा. पां. कृ.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

सावळापूरकर व अविरत श्रम घेणारे कार्यवाह प्रा. माणिक के. बैतुले यांना धन्यवाद द्यावे तितके थोडेच होतील. या दोघांच्या श्रमाचें मोल ठरवितां येत नाही त्यांनी व त्यांचे समितींतील डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. वसंत बाळाजी शब्दे, श्री. तु. ना. काटकर, श्री. द. शं. फशके, सौ. उषाबाई कोलते, प्रा. दा. ल. अडोणी व श्री. दि. ब. पंडित प्रभृति सदस्यांनी आणि केन्द्राधिकाऱ्यांनी जें बहुमोल सहकार्य देऊन या समितीला यश प्राप्त करून दिलें त्या सर्वांचा वि. सा. संघ अत्यंत आभारी आहे. परीक्षा समितीचें हें यश खालील तौलनिक प्रगतिपटावरून सिद्ध होईल.

क.	सन	पारंगत	स्नातक	परिचित	विनीत	प्रारंभ	प्रवेश	एकूण विद्यार्थी	केन्द्रें
१. ऑगस्ट	१९५२	६	१५	४९	२००	८८	१०	३६४	१९
२. ,,	१९५३	२	३२	५१	३३४	११५	२१	५५५	३६
१. ,,	१९५४	–	६९	६३	५९०	२३०	९२	१०४०	४२
४. ,,	१९५५	९	४३	११८	६७९	४५१	१३०	१४४०	४७

या वर्षी भिन्न परीक्षांतील उत्तीर्ण विद्यार्थी

क.	सन	पारंगत	स्नातक	परिचित	विनीत	प्रारंभ	प्रवेश	ए. विद्यार्थी	केंद्रें
१.	ऑगष्ट ५४	–	३५	३२	३९३	१८०	५६	६२६	४२
२.	जानेवारी ५५	५	२५	५९	४५०	२८०	६८	८८७	४७

प्रगतीच्या या आकडयांवरून गेल्या ७ वर्षांत जी संख्या होती त्या मानाने या वर्षीची संख्या किती तरी पटीने वाढली असून, हें वाखाणण्याजोगें यश वाढतेंच राहील यांत शंका नाही. ही प्रगति संचालकांनी, त्यांच्या कार्यवाह आणि सदस्यांनी मोठ्या पद्धतशीर व व्यवस्थित रीतीने घडवून आणली आहे. अनेक माहितीपत्रकें, सूचिपत्रकें. उपयुक्त तक्ते छापून त्याद्वारेंहि समितीचें काम यशस्वी केलें आहे. आणि आता तर कांही कांही केन्द्रांना परीक्षेसाठी पाठ्यपुस्तकांचा सेटहि देण्याची व्यवस्था करून अडचणी दूर सारण्याचा कसोशीचा प्रयत्न केला आहे. परीक्षा समितीचें हें वाखाणण्याजोगें वाढतें यश लक्षांत घेऊन वि. सा. संघ या समितीवर यापुढे आहे त्यापेक्षा अधिक भर देईल व व्यापाच्या मानाने योग्य ती सोय करून कार्य अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न करील, अशी आशा आहे.

सांस्कृतिक कार्यक्रम समितीचें यश

यंदा सांस्कृतिक समितीने नाविन्यपूर्ण कार्यक्रम घडवून सभासदांना बरेंच बौद्धिक व सांस्कृतिक खाद्य पुरविलें आहे. पूर्वीची कार्यक्रम समिति या सांस्कृतिक समितींत सामील झाल्याने थोर साहित्यिक व पुढारी यांच्या वि. सा. संघाला भेटी घडविण्यांत आल्या व त्यांच्या मननीय विचारांचें दर्शनहि घडविण्यांत आलें. सांस्कृतिक समितीने या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

वर्षी दर पौर्णिमेच्या सुमारास कौमुदी उत्सव साजरा केला. असे सहा उत्सव साजरे करण्यांत आले. ख्यातनाम साहित्यिकांची भाषणें, नाट्यावरील चर्चा, मनोरंजक परिसंवाद, शास्त्रोक्त गायन इत्यादि कार्यक्रम या कौमुदी उत्सवाचे वेळीं यशस्वी रीतीने पार पडले. या वर्षी गेल्या दोन वर्षाप्रमाणे व्याख्यानमालेचा सप्ताह कांही अपरिहार्य अडचणीमुळे साजरा करतां आला नसला, तरी ही उणीव संमेलनाचे प्रसंगीं संस्कृत नाटकासह चार नाटयप्रयोग करून भरून काढण्यांत आली. या सांस्कृतिक समितीचे आमंत्रक केशव केळकर यांनी बरेच परिश्रम घेतले असून, त्याबरोबर सौ. प्रभावतीबाई पुरोहित, श्री. ना. हि. सोनडुले, म. ता. सावजी, श्री. य. शं. धर्माधिकारी, श्री. रा. पु. सगदेव व श्री. नानासाहेब जोग यांनी सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यास मदत केली आहे. डॉ. भी. रा. आंबेडकर, ना. जगजीवनराम, अशोक मेहता, भारताचे अर्थमंत्री श्री. चिं. द्वा. देशमुख, मध्यप्रदेशाचे राज्यपाल डॉ. पट्टाभि सीतारामय्या प्रभृति थोर नेत्यांच्या भेटी व भाषणें तसेंच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. वि. भि. कोलते, श्री. मुक्तिबोध, श्री. प्रभाकरराव माचवे, प्रि. वा. वि. मिराशी, प्रा. श्री. म. माटे, श्री. गोपीनाथ तळवलकर, श्री. पु. भा. भावे, श्री. धुंडिराजशास्त्री, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. अरविंद गोखले अशा थोर साहित्यिकांचीं विचारपरिपूर्ण व्याख्यानें आणि सिनेश्रेष्ठ राजा परांजपे, श्री. पृथ्वीराज कपूर, श्री. वा. वा. भोळे, श्री. सखारामपंत जोशी, मनोहर परांजपे, श्री. नानासाहेब जोग आदि नाटककारांची व कलावंतांची विविध विषयावर चर्चा घडवून आणली.

गडकरी स्मारक समिति

दरवर्षाप्रमाणे यंदाहि ग. स्मा. समितीने आपलें कार्य ठाशीव स्वरूपांत केलें आहे. गडकरी स्मृतिदिन सुप्रसिद्ध लेखिका प्र श्रीमती शांताबाई शेळके यांचे अध्यक्षतेखाली थाटाने साजरा करण्यांत आला. त्यावेळीं प्रा. श्री. मा. कुळकर्णी यांचें 'गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत' या विषयावर प्रबंध वाचन झालें. आचार्य प्र. के अत्रे यांनी ग. स्मारक गृहाला भेट देऊन कै. गडकऱ्यांसंबंधी उद्बोधक माहिती दिली. गडकरी स्मारकाच्या मदतीसाठी 'एखाद्याचं नशीब' या नाटकाचा प्रयोग मराठी रंगभूमि, पुणें यांनी केला. हें सर्व कार्य कार्याध्यक्ष कु ताराबाई प्रधान व कार्यवाह श्री. पां. बा. गडकरी यांनी श्रमपूर्वक यशस्वी केलें. त्याचप्रमाणे श्री. नी. सी. कारखानीस, श्री. र. वि. कुळकर्णी, श्री. चंदुलाल सुळे, श्री. नानासाहेब ओगले, सौ. पद्मावतीबाई चिटणवीस, श्री. टी. आर. नागले. सौ. उषाताई कोलते, श्री. रा. पु. सगदेव, प्रा. श्री. वि. गंधे प्रभृतींनी सहकार्य देऊन जी मदत केली त्याबद्दल आम्ही आभारी आहोंत.

निविदा व प्रकाशन समिति

या वर्षी 'सुमन संचय' व 'मराठी गद्य' या दोन पुस्तकांच्या नवीन आवृत्त्या प्रसिद्ध करण्यांत आल्या आहेत. या कामासाठी निविदा मागविणें व दूरदर्शीपणाने विचार करून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांची व्यवस्था लावणें, तसेंच पुस्तकांत योग्य त्या दुरुस्त्या करणें इत्यादि कष्टाचीं कामें प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्री. पु. य. देशपांडे, कै. ह. ना. नेने, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. भ. श्री. पंडित व श्री. दि. ब. पंडित य.नी करून वि. सा. संघाला बहुमोल मदत केली आहे.

त्याचप्रमाणे मंदिर रचना समिति, मंदिर निधिसमिति यांनी आणि घटनाविषयक प्रश्न समिति, भाषाविषयक संशोधन समिति, पुस्तकालय समिति, नाटय समिति, शुद्ध-लेखन समिति, साहित्यसंस्था सहकार समिति, आगरकर चरित्र लेखन पारितोषिक समिति इ. समित्यांनी व उपसमित्यांनी आपआपली कामगिरी योग्य रीतीने पार पाडली आहे या समित्यांतील सर्व सभासदांचे आम्ही फार आभारी आहोंत.

दैनंदिन कामाच्या बाबतींत प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे आणि वि. सा. संघाचे विश्वस्त न्यायमूर्ति अण्णासाहेब मंगळमूर्ति यांची झालेली मदत व मार्गदर्शन तसेंच श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व श्री. नानासाहेब जोग प्रभृति कार्यकर्त्यांचें सहाय्य बहुमोल आहे. विशेषाच्या बाबतींत तर कोषाध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी मोठया दक्षतेने व जागरूकतेने लक्ष घालून संस्थेचे हिशेब अगदी चोख राखले आहेत.

वि. सा. संघाच्या अनेक थोर कार्यकर्त्यांनी व सभासदांनी वेळोवेळीं आम्हाला मदत देऊन व योग्य तें मार्गदर्शन करून आम्हाला उपकृत केलें आहे. त्याबद्दल आम्ही आपली कृतज्ञता व्यक्त करतों. सर्वांनी आम्हांवर विश्वास टाकून जी जबाबदारी टाकली ती अल्पस्वल्प प्रमाणांत कां होईना पार पाडण्याचा आम्ही प्रयत्न केला. त्यांत कांही आमच्या हातून कमीअधिक घडलें असल्यास आपण उदार अंतःकरणाने आम्हाला क्षमा करावी, ही विनंती. जयहिंद.

ल. वि. पांढरीपांडे
चिटणीस

ना. रा. शेंडे
सरचिटणीस

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर, म. प्र.

(१-४-१९५४ ते ३१-३-१९५५) ३१ मार्च १९५५ ला संपणाऱ्या वर्षाच्या जमाखर्चाचा तक्ता

जमा	रु. आ. पै.	रु. आ. पै.
आरंभीची शिल्लक		
नगदी जवळ	१५-४-१०	
बँकेंत	८,८११-९-०	
मुदतीची ठेव	३,५००-०-०	१२,३२६-१३-१०
वर्गणी		
साधारण सभासद	३,७७१-०-०	
आजीव ,,	३०१-०-०	४,०७२-०-०
पाठ्य पुस्तक प्रतिलिपि अधिकार		३,०५०-०-०
परीक्षा शुल्क		५,१३८-६-०
किरकोळ जमा		१,०३६-९-०
इतर देणग्या		२२५-०-०
मंदिरासाठी सरकारी अनुदान		१०,३३३-०-०
सरकारी अनुदान		७,५००-०-०
सांस्कृतिक समिति		४७-८-०
पुस्तक विक्री		९९-११-०
ठेवीवरील व्याज		२१७-१४-३
अमरावती शाखा (श्री. अण्णासाहेब खापर्डे यांचेकडील जुना हिशेब)		१८१-५-९
१७ वें संमेलन (सस्पेन्स अकाउंट)		९०-१-३
लो. अणे तैलचित्रासाठी		६०-०-०
ॲडव्हान्स परत		२१३-१५-९
सस्पेन्स अकाउंट		५०-०-०
		४८,२४६-४-१०

खर्च	रु. आ. पै.	रु. आ. पै.
वेतन खर्च		३,६८९-०-९
टपाल व तारखर्च		५१४-१२-३
मुद्रण व स्टेशनरी		१,२७५-२-६
युगवाणी मुद्रण		३,९७१-९-६
वाहन व प्रवास		९५८-२-०
किरकोळ खर्च		२३०-११-६
सांस्कृतिक कार्यक्रम		४०७-०-०
आतिथ्य		२५९-९-६
वीज खर्च		५२५-१५-३
मंदिर रचना खर्च		१३,८९७-१५-९
वस्तु खरेदी		३८७-१०-७
बँक कमिशन		९-१२-०
परीक्षा खर्च		३,५००-०-०
अंशदान		१५७-८-०
कार्यालयीन व्यवस्था		१,२३९-९-६
उद्घाटन समारंभ		१,४७४-५-६
सिक्युरिटी डिपॉझिट		५-०-०
ऑडिट फी		५०-०-०
कर्जावरील व्याज		२२५-०-०
बँक		
म. प्र. को-ऑ. हा. सोसायटी	४,१५०-१४-३	
म. प्र. को-ऑ. बँक	१२६-११-९	
महाराष्ट्र बँक करंट अकाउंट	६,७८०-१४-६	
,, ,, बिल्डिंग फंड अकाउंट	९०८-१२-९	११,९६७-५-३
मुदतीची ठेव		३,५००-०-०
अखेर शिल्लक जवळ		०-३-०
		४८,२४६-४-१०

नागपूर, दि. १४ एप्रिल १९५५

तपासलें व तें बरोबर आहे.

(सही) महेश्वर गद्रे आणि कं०, चार्टर्ड अकाउंटंटस्.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Vidarbha Sahitya Sangh

NAGPUR, M. P.

Receipts and Payments Statement for the year ending on 31st March 1955

(1-4-54 to 31-3-55)

RECEIPTS	Rs. As. P.	Rs. As. P.
To, Opening Balance		
Cash in hand	15-4-10	
,, at Bank	8,811-9-0	
Fixed Deposits	3,500-0-0	12,326-13-10
,, **Subscriptions**		
Ordinary Members	3,771-0-0	
Life	301-0-0	4,072-0-0
,, Receipts from Royalties		3,050-0-0
,, Examinations Fees		5,138-6-0
,, Miscellaneous Receipts		1,036-9-0
,, ,, Grants		225-0-0
,, Building Grants		3,604-0-0
,, Govt. Grant to Building		10,333-0-0
,, Govt. Maintainance Grant		7,500-0-0
,, Sanskrutik Samiti		47-8-0
,, Sale of Books		99-11-0
,, Interest on Deposits		217-14-3
,, Amravati Branch (Old Bal. received from Shri Annasaheb Khaparde)		181-5-9
,, Sammelan Account (Credit Balance Suspence Account)		90-1-3
,, Donations for oil-painting of Shri Aney		60-0-0
,, Advance Returned		213-15-9
,, Suspence Account		50-0-0
		48,246-4-10

PAYMENTS	Rs. A. P.	Rs. As. P.
By Salaries		3,689-0-9
,, Postage & Phones		514-12-3
,, Printing & Stationery		1,275-2-6
,, Yugawani Printing		3,971-9-6
,, Travelling and Conveyance		958-2-0
,, Miscellaneous Expenses		230-11-6
,, Cultural Activities		407-0-0
,, Entertainment		259-9-6
,, Electric charges		525-15-3
,, Expenses on Mandir Samiti (Bldg. Com.)		13,897-15-9
,, Purchases of Articles		387-10-7
,, Bank Commission		9-12-0
,, Examinations Expenses		3,500-0-0
,, Branches' Share		157-8-0
,, Office Expenses		1,239-9-6
,, Opening Ceremony		1,474-5-6
,, Security Deposit		5-0-0
,, Audit Fees		50-0-0
,, Int. on Loan		225-0-0
,, **Bank**	Rs. A. P.	
M P Co-op. Hous. Society	4,150-14-3	
M. P. Co-op. Bank	126-11-9	
Maharashtra Bank Current Account	6,780-14-6	
Maharashtra Bank Building Fund.	908-12-9	11,967-5-3
,, **Fixed Deposit**		3,500-0-0
Closing Balance Cash in hand		0-3-0
		48,246-4-10

Dated, Nagpur, the 14th April 1955

Examined and found correct.

(Sd.) **Maheshwar Gadre Co., Charterd Accountants.**

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मंदिर समिति-विदर्भ साहित्य संघ,
नागपूर, म. प्र.

(१-४-५४ ते ३१-३-५५) ३१ मार्च १९५५ ला संपणाऱ्या वर्षाच्या आयव्ययाचा तक्ता

आय	रु. आ. पै.	व्यय	रु. आ. पै.
आरंभींचो शिल्लक	९३-१३-०	पोस्टेज, टेलिग्राम्स आणि स्टेशनरी	४९-११-३
बिल्डिंग फंड खात्यांतून काढलेली एकूण रकम	१३,८९७-१५-९	एस्टॅब्लिशमेंट	७५३—८-०
डिस्पोझल्स	१,२४५-१४-०	प्रवास आणि वाहन	२०७-१५-०
अस्थायी बांधकाम	५०१—०-०	किरकोळ (वीज, टेलिफोन बिलें, रिपेरी)	२२३—२-०
		बांधकामाकरितां मजूरी	४,५५७-१३-०
		रेती	४२७-११-०
		मुरुम आणि राख (Coal Ash)	३७६—१-०
	१५,७३८-१०-९	लांकूड	१,३४८-१४-६
		विटा	३२१—२-०
		सिमेंट	२,८६३—८-६
		इमारती सामान	१,९९८—५-३
		लेव्हलिंग, कुंपण आणि बाग	३३२—८-०
		नकाशे, आराखडे (Drawings)	१२२-१३-०
		विजेचें सामान	१,९००-०-०
		डिपॉझिट (इलेक्ट्रिक डिपा.)	२३०—३-०
			१५,७०९-०-६
		अखेरची शिल्लक—नगदी जवळ	२९-१०-३
	१५,७३८-१०-९		१५,७३८—१०-९

नागपूर, दि. १४ एप्रिल १९५५

तपासलें व ते बरोबर आहे.

(सही) **महेश्वर गद्रे आणि कं०,**
चार्टर्ड अकाउंटंट.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

Building Committee (Mandir Samiti) Vidarbha Sahitya Sangh

NAGPUR, M. P.

Receipts and Payments Statement for the period ending on 31st March 1955

(1-4-54 to 31-3-55)

Receipts	Rs. As. P.	Payments	Rs. As. P.
Opening Balance	93-13—0	Postage and Telegrams and Stationery	45-11—3
Total withdrawal from Building Fund Account	13,897-15—9	Establishment	753—8—0
Disposals	1,245-14—0	Travelling and Conveyance	207-15—0
Temporary Construction	501—0—0	Miscellaneous (Electric Bills, Telephone Bills, Repairs)	223—2—0
		Constructional Wages	4,557-13—0
		Sand	427-11—0
		Murrum and Coal Ash	376—1—0
		Timber	1,348-11—6
		Bricks	321—2—0
		Cement	2,863—8—6
		Building Material	1,998—5—3
		Levelling, Fencing and Gardening	332—8—0
		Maps, Drawings	122-13—0
		Electrical Installations	1,900—0—0
		Deposits (Elec. Dept.)	230—3—0
	15,738-10—9		15,709—0—6
		Closing Balance- Cash in hand	29-10—3
	15,738-10—9		15,738-10—9

Examined and found correct.

Dated, Nagpur, the 14th April 1955

(Sd.) **Maheshwar Gadre Co.**
Chartered Accountants.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर (म. प्र.)

३१ मार्च १९५५ रोजीं असलेलें 'बॅलन्स शीट'

फंड आणि लायएबिलिटीज	रु. आ. पै.	रु. आ. पै.
आजीव सभासद		
मागील बॅ. शी. मधील शिल्लक	३,२६१—०-०	
चालूं सालांतील जमा	३०१—०-०	३,५६२—०-०
मंदिर निधि		
मागील बॅ. शी. मधील शिल्लक	४८,७९४-१२-०	
चालूं सालातील जमा	३,६०४—०-०	५२,३९८-१२-०
मंदिरासाठी सरकारी अनुदान		
मागील बॅ. शी. मधील शिल्लक	२०,०००—०-०	
चालूं सालांतील जमा	१०,३३३—०-०	३०,३३३—०-०
तैलचित्रांसाठी		
मागील बॅ. शी. मधील शिल्लक	९०—०-०	
चालूं सालांतील जमा	६०—०-०	१५०—०-०
सस्पेन्स अकाउंट		
मागील बॅ. शी. मधील शिल्लक	१२०—०-०	
चालूं सालांतील जमा	५०—०-०	
१७ वें संमेलन (Credit Balance)	९०—१-३	२६०—१-३
जनरल फंड		
मागील बॅ. शी. मधील शिल्लक	२७,६३९-११-०	
चालूं सालांतील जमापैकी इ/ए. खात्यांतील शिल्लक	४,०७२—३-६	
अमरावती शाखा (जुना हिशेब)	१८१—५-९	३१,८९३—४-३
		१,१८,५९७—१-६

ॲसेटस् आणि प्रॉपर्टीज	रु. आ. पै.	रु. आ. पै.
टिनशेड आणि विहीर		५,३४१-१३-९
इलेक्ट्रिक डिपॉझिटस्		
मागील बॅ. शी. मधील रक्कम	३२६—०-०	
चालूं सालांतील वाढ	५—०-०	३३१—०-०
फर्निचर		
मागील बॅ. शी. मधील रक्कम	५,५८४—८-८	
चालूं सालांतील वाढ	३८७-१०-७	५,९७२—३-३
मंदिर इमारत		
मागील बॅ. शी. मधील रक्कम	७६,०७१-११-०	
चालूं सालांतील वाढ	१३,८९७-१५-९	
उद्‌घाटन समारंभ खर्च	१,४७४—५-६	९१,४४४—०-३
पुस्तकें		४०—८-०
मुदतीची ठेव		३,५००—०-०
बॅंकेंतील शिल्लक		११,९६७—५-३
नगदी शिल्लक		०—३-०
		१,१८,५९७—१-६

प्रमाणपत्र:—विदर्भ साहित्य संघ या संस्थेच्या ३१ मार्च १९५५ रोजीं तयार असलेल्या बॅलन्सशीटमधे वर दिलेले आंकडे संघाच्या जमाखर्चाच्या पुस्तकांशीं तंतोतंत जुळतात आणि हीं पुस्तकें आम्ही तपासलीं असून तीं बरोबर आहेत असें प्रमाणपत्र आम्ही देतों.

(सही) महेश्वर गद्रे आणि कं०, चार्टर्ड अकाउंटंटस्.

नागपूर, दि. १४ एप्रिल १९५५

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Vidarbha Sahitya Sangh, Nagpur (M. P.)

Balance Sheet as at 31st March 1955

Fund and Liabilities	Rs. A. P.	Rs. A. P.
Life Members		
Balance as per last Balance Sheet	3,261—0-0	
Additions during the year	301—0-0	3,562—0-0
Mandir Fund		
Balance as per last Balance Sheet	48,794-12-0	
Additions during the year	3,604—0-0	52,398-12-0
Government Building Grant		
Balance as per last Balance Sheet	20,000—0-0	
Additions during the year	10,333—0-0	30,333—0-0
For Paintings		
Balance as per last Balance Sheet	90—0-0	
Additions during the year	60—0-0	150—0-0
Suspense Account		
Balance as per last Balance Seet	120—0-0	
Additions during the year	50—0-0	
Sammelan Account Credit Balance	90—1-3	260—1-3
General Fund		
Balance as per last Balance Sheet	27,639-11-0	
Current year's B/F from I/E a/c	4,072—3-6	
Amravati Branch (old Bal.) Received	181—5-9	31,893—4-3
		1,18,597—1-6

Assets and Properties	Rs. A. P.	Rs. A. P.
Tinshed and Well		5,341-13-9
Electric Deposits		
Balance as per last Balance Sheet	326—0-0	
Additions during the year	5—0-0	331—0-0
Furniture and Fixtures		
Balance as per last Balance Sheet	5,584—8-8	
Additions during the year	387-10-7	5,972—3-3
Mandir Buildings		
Balance as per last Balance Sheet	76,071-11-0	
Additions during the year	13,897-15-9	
Opening Ceremony expenses	1,474—5-6	91,444—0-3
Books		40—8-0
Fixed Deposits		3,500—0-0
Bank Balances		11,967—5-3
Cash in Hand		0—3-0
		1,18,597—1-6

Certificate—Certified that the figures shown in the above Balance Sheet of the VIDARBHA SAHITYA SANGH, Nagpur as on 31st March, 1955 agree with the books of accounts maintained which have been audited by us are found to be correct.

Dated, Nagpur, the 14th April 1955

(Sd.) **Maheshwar Gadre & Co.,**
Chartered Accountants.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. * सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

अनुक्रमणिका